सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित | किंमत रु. ६/-
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३२५ | पाने : ८

## कतारशी संबंध मजबूत करण्यासाठी पंतप्रधानांनी तोडले सर्व 'प्रोटोकॉल'!

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व प्रोटोकॉल तोडून सोमवारी संध्याकाळी (१७ फेब्रुवारी) दिल्लीच्या इंदिरा गांधी विमानतळावर स्वतः जाऊन कतारचे अमीर यांचे स्वागत केले. भारत आणि कतार यांच्यातील संबंध मजबूत करण्यासाठी मोदींकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे.कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत.



कतारचे अमीर अल थानी हे २ दिवसीय भारत दौऱ्यावर आले आहेत. यात ते पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत द्विपक्षीय चर्चा करतील आणि दोन्ही देशांमध्ये महत्त्वाचे करार समंत केले जातील. परराष्ट्र खात्यानुसार, कतारचे अमीर यांचं मंगळवारी (१८ फेब्रुवारी )राष्ट्रपती भवन परिसरात औपचारिक स्वागत केले जाईल. त्यानंतर दिल्लीच्या हैदराबाद हाऊस येथे पंतप्रधान मोदींसोबत त्यांची बैठक होईल. कतारचे अमीर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार आहेत.

पंतप्रधान मोदी यांच्या आमंत्रणावरून अमीर अल थानी दुसऱ्यांदा भारत दौऱ्यावर आलेत. याआधी ते २०१५ साली दिल्ली दौऱ्यावर आले होते. भारत आणि कतार यांच्यात अलीकडच्या काळात व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, औद्योगिक, संस्कृती यासह विविध क्षेत्रात मजबूत संबंध तयार झाले आहेत. यावेळीही कतारचे अमीर अल थानी यांच्या दौऱ्यावर महत्त्वाच्या करारावर शिक्कामोर्तब होऊ शकते.

३ जून १९८० साली कतारच्या दोहा इथं जन्मलेले तमीम बिन अल थानी यांचे वडील शेख हमद बिन खलिफा अल थानी यांच्यानंतर २५ जून २०१३ साली कतारचे अमीर बनले होते. ब्रिटनमध्ये शिक्षण पूर्ण करून तमीम बिन हमद यांनी कतार सैन्यात त्यांची सेवा दिली. ४४ वर्षीय तमीम ना केवळ कतारमधील सर्वात युवा श्रीमंत आहेत तर जगातील सर्वात युवा राष्ट्राध्यक्षांमध्येही त्यांचं नाव घेतले जाते. कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी जगातील ९ वे सर्वात श्रीमंत शासक आहेत. त्यांची संपत्ती जवळपास ३३५ अब्ज डॉलर्स इतकी आहे.

## कॅनडा विमानतळावर लॅण्डिंगदरम्यान विमान उलटले, १७ जण जखमी

ओटावा : कॅनडातील टोरंटो विमानतळावर एक मोठा विमान अपघात झाला आहे. डेल्टा एअरलाइन्सचे विमान सोमवारी (१७ फेब्रुवारी ) लँडिंग करताना बर्फाळ जमिनीमुळे उलटले. विमानातील ७६ प्रवाशांपैकी १७ जण जखमी झाले असून सुदैवाने या घटनेत जीवीत हानी झाली नाही.



मिळालेल्या माहितीनुसार, डेल्टा एअरलाइन्सचे हे विमान अमेरिकेतील मिनेसोटा येथून टोरंटो विमानतळावर उतरणार होते. मात्र, विमान लँडिंग दरम्यान बर्फाळ जमिनीमुळे विमानाचे नियंत्रण सुटले आणि ते उलटले.या विमानात ७६ प्रवासी आणि ४ क्रू मेंबर्ससह ८० प्रवासी होते. या अपघातात विमानातील ७६ प्रवाशांपैकी १७ जण जखमी झाले आहेत. ज्यात तीन गंभीर आहेत. गंभीर प्रवाशांमध्ये एक लहान मुलगा असून ६० वर्षीय एक पुरुष आणि ४० वर्षीय महिला आहे. किरकोळ दुखापत झालेल्या जखमींना रुग्णवाहिका आणि हेलिकॉप्टरने परिसरातील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती पॅरामेडिक सर्व्हिसेसचे लॉरेन्स सँडन यांनी दिली.

या अपघाताचा व्हिडिओ देखील समोर आला आहे.ज्यामध्ये लोक उलट्या विमानातून अडखळत बाहेर पडताना दिसत आहेत.यावेळी विमानतळावर बर्फवृष्टी होत असून जोरदार वारेही वाहत आहेत. क्रॅश लँडिंगनंतर विमानाला आग लागली. त्यावेळी विमानात अनेक प्रवासी होते. अग्निशमन दलाच्या अनेक पथकांनी तातडीने येऊन आग विझवली. त्यांनी काही मिनिटीतांच अपघातस्थळावरू प्रवाशांना बाहेर काढलं.

हे विमान कसे उलटले हे अद्याप कळू शकलेले नाही. कॅनडाचे वाहतूक सुरक्षा मंडळ या अपघाताची चौकशी करत आहे. दरम्यान, खराब हवामान, जोरदार वारे यामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. या दुर्घटनेनंतर विमानतळावरील कामकाज काही काळ थांबवण्यात आले होते. त्याचवेळी स्थानिक वेळेनुसार सायंकाळी पाच वाजता पुन्हा विमानसेवा सुरू झाली.







72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE

*नियम आणि अटी लागू. *N160 वेरिएंट्ससाठी एक्स-शोरुम किंमत महाराष्ट्र. बजाज ऑटोने पूर्व सूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. आपल्या सेगमेंटमध्ये. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरविजन अंतर्गत नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून वेगळ्या जागी केली आहेत. ह्या साहसाचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्सवर आणि विशिष्ट राज्यांमध्ये उपलब्ध. अधिक माहिती बजाज डीलरकडून मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून दिली जाते आणि त्यांच्या नियम व अटींच्या अधीन असते.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 7276183895**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ausa** 8149542017 **Murud** 9860351229, **Chakur** 9049746161, **Renapur** 9881951011, **Omerga** 9890521818, **Paranda** 9421212280, **Kallamb** 8329268718, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Ottur** 8007000790, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959, **Rahata** 9881239140.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विवोने ३४,९९९ रुपयांना लाँच केला वी ५० स्मार्टफोन, उत्तम डिझाइन, उत्तम फोटोग्राफी आणि उत्तम कामगिरीसह

पुणे- नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड विवोने आज त्यांच्या व्ही मालिकेतील एक जबरदस्त स्मार्टफोन व्ही५० लाँच केला. वीवो वी५० हा भारतातील सर्वात पातळ स्मार्टफोन (०.७३९ सेमी) आहे ज्यामध्ये ६,००० एमएएच बॅटरी आणि अल्ट्रा-स्लिम क्वाड कर्व्हड डिस्प्ले आहे. या स्मार्टफोनमध्येविवो-ज़ीस सह-अभियांत्रिकी इमेजिंग सिस्टम आहे, जी एक आश्चर्यकारक पोर्ट्रेट अनुभव देते. विवोच्या एका अभ्यासानुसार, भारतात दरवर्षी २५,००० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या स्मार्टफोनचा वापर करून २ अब्जाहून अधिक लग्नाचे फोटो काढले जातात. हे लक्षात घेऊन, विवोने एक खास वेडिंग पोर्ट्रेट स्टुडिओ देखील सादर केला आहे. ग्राहकांच्या पसंतीनुसार, विवोने व्ही ५० मध्ये आणखी एक उत्तम वैशिष्ट्य जोडले आहे. हा स्मार्टफोन तीन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असेल - रोझ रेड (भारतीय लग्नांपासून प्रेरित), स्टाररी नाईट (ज्यामध्ये स्मार्टफोनमध्ये भारतातील पहिले ३ऊ-स्टार तंत्रज्ञान आहे) आणि टायटॅनियम ग्रे. डिझाइन, अपवादात्मक फोटोग्राफी अनुभव आणि शक्तिशाली कामगिरीसाठी डिझाइन केलेले, वीवो वी ५० ८ जीबी + १२८ जीबी व्हेरिएंटसाठी खछ्ठ ३४,९९९ (सर्व करांसह), ८ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटसाठी ख३६,९९९ (सर्व करांसह) आणि १२जीबी + ५१२जीबी व्हेरिएंटसाठी आईएनआर ४०,९९९ (सर्व करांसह) मध्ये उपलब्ध असेल. हा स्मार्टफोन २५ फेब्रुवारीपासून विवोच्या अधिकृत वेबसाइट, फ्लिपकार्ट, अमेझॉन आणि सर्व भागीदार रिटेल स्टोअर्सवर विक्रीसाठी उपलब्ध असेल.

## स्फूर्तिगीतातून भाजपाचे संघटन वाढीचे प्रयत्न

मुंबई- भारतीय जनता पार्टीचं महाराष्ट्रात सध्या संघटन पर्व सुरु आहे ज्यामध्ये दीड कोटी सदस्य बनविण्याचे पक्षाने उद्दिष्ट ठेवले असून विविध माध्यमांतून महाराष्ट्रातील जनतेला भाजपाची विचारधारा पोहोचवून पक्षाकडे आकर्षित करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे, त्याचाच एक भाग म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून भाजपा स्फूर्तिगीत तयार करण्यात आले आहे. या ऊर्जादायी गाण्याचे विमोचन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते मुंबई येथील सदस्यता महा अभियान २०२५ अंतर्गत आयोजित संघटन पर्व कार्यशाळा या भव्य कार्यक्रमात करण्यात आले.

## ५० दशलक्ष ग्राहकांना त्यांच्या क्रेडिट जागरूकता उपक्रमाचा फायदा

मुंबई : भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक क्रेडिट डिजिटल मार्केटप्लेस, पैसाबाजारने जाहीर केले की आतापर्यंत ५ कोटींहून अधिक ग्राहकांनी त्यांच्या प्लॅटफॉर्मवर त्यांचे क्रेडिट स्कोअर मोफत तपासले आहेत, ज्यामुळे ते भारतातील सर्वात मोठे मोफत क्रेडिट जागरूकता उपक्रम बनले आहे. हे पाऊल गेल्या दशकात पैसाबाजारच्या मोफत क्रेडिट स्कोअर उपक्रमाद्वारे क्रेडिट जागरूकता आणि आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.पैसाबाजारचा मोफत क्रेडिट स्कोअर उपक्रम २०१७ मध्ये सुरू करण्यात आला. पैसाबाजारावरील क्रेडिट स्कोअर, आयुष्यभर मोफत. हे ग्राहकांना सात भाषांमध्ये वेगवेगळ्या क्रेडिट ब्युरोमधून त्यांचा क्रेडिट स्कोअर तपासण्याची परवानगी देते. गेल्या काही वर्षांत, पैसाबाजारने तंत्रज्ञानात सतत गुंतवणूक करून नावीन्यपूर्णतेवर लक्ष केंद्रित केले आहे जेणेकरून क्रेडिट स्कोअर तपासणे आणि ट्रॅक करणे सोपे होईलच, शिवाय जागरूकता पसरवणे आणि क्रेडिट आरोग्य सुधारण्यासाठी अंतर्दृष्टी प्रदान करणे देखील शक्य होईल.

# जितो लेडीज विंगच्या २०२४-२६ कार्यकारिणीचा भव्य पदग्रहण सोहळा सपन्न



अध्यक्षा प्रिया मुथा | उपाध्यक्षा रितु जैन | उपाध्यक्षा प्रिती बाकलीवाल | सचिव सोनल जैन | सहसचिव सपना मुथियान | सहसचिव सारिका शेठी | कोषाध्यक्षा प्रियंका संघवी

छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद खिंवसरा मुख्यालयात जितो (जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन) लेडीज विंगच्या २०२४-२०२६ कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात पार पडला. यावेळी सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यकम आयोजीत करण्यात आला होता. प्रसंगी प्रिया मुथा यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली, तर एक सक्षम आणि प्रेरणादायी कार्यकारिणी त्यांच्यासोबत महिला सक्षमीकरण, व्यवसाय, व्यावसायिकता आणि सामाजिक प्रगतीच्या दिशेने कार्यरत राहणार आहे.

नवीन कार्यकारिणीत रितु जैन आणि प्रीती बाकलीवाल यांची उपाध्यक्ष, सोनल जैन यांची मुख्य सचिव, सपना मुथीयान आणि सारिका सेठी यांची संयुक्त सचिव, तर डॉ. प्रियांका संघवी यांची खजिनदार म्हणून निवड झाली. ही कार्यकारिणी महिलांच्या उद्योग आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविणार आहे.

कार्यक्रमास जितो ॲपेक्स टिमचे ऊध्यक्ष पृथ्वीराज कोठारी, विजय भंडारी, इंदर डी.जैन, रमेशकुमार हरण, उपाध्यक्ष कमलेश सोजतिया, महासचिव ललीतकुमार डागी, सचिव महावीर चपजोत, कोषाध्यक्ष संपतराज चपलोत, संचालक व झोन अध्यक्ष राजेंद्र सुरेश जैन, संचालक राजेश साकला, प्रियंका परमार यांच्यासह विशिष्ठ अतिथी जितो चे ट्रस्टी उज्वल पगारिया, रजत हारडी जितो युवा विंग, जितो आर.ओ.एम चे अध्यक्ष अजयबेद मुथा, उपाध्यक्ष पारस ओस्तवाल, मुख्य सचिव तृत्वी कर्नावट, कोषाध्यक्ष हेमंत कोठारी, सचिव दिपक मुथा, जितो लेडीज विंगचे संयोजीका डिंपल पगारीया, जितो चे संयोजक गौतम मुथा, जितो छत्रपती संभाजीनगर व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष अनिलकुमार संचेती, उपाध्यक्ष दिपेश मुथा, उपाध्यक्ष फुलचंद जैन, मुख्य सचिव आशिष संकलेचा, संयुक्त सचिव आमित खाबीया, कोषाध्यक्ष अलोक डिओरा, सहकोषाध्यक्ष पंकज पांडे, संचालक किरण साकला, तुषार अजमेरा, मनोज जैन, जितो संभाजीनगर सल्लागार समिती चे पुखराज पगारीया, सुभाष नहार, गौतम संचेती, रवि खिंवसरा, जितो संभाजीनगर युवा विंगचे अध्यक्ष नमीत मुथीयान, मुख्य सचिव रोहन मुनोत, जितो जालना महिला विंगचे दिप्ती पाटणी संयोजक, रोमा पाटणी सहसंयोजक, जितो जालना युवा विंगचे कुशल गेलडा, रोशन रैणवाल यांच्यासह अनेक मान्यवर, जितो सदस्य तसेच उद्योग व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. सोहळ्यात प्रेरणादायी भाषणं, नवीन कार्यकारिणीचा दृष्टिकोन सादरीकरण, तसेच शपथग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला, ज्यामुळे सदस्यांनी आपल्या जबाबदारी पाडण्याचा दृढ निश्चय केला

# महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण कराल तर तुरुंगात जाल!

## दोषींना दोन ते १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद

छत्रपती संभाजीनगर : वीजग्राहकांच्या सेवेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणारे महावितरणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी सध्या कंपनीवरील आर्थिक संकटामुळे थकीत वीजबिलांची वसुली मोहीम राबवत आहेत. यात थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. या शासकीय कामात छत्रपती संभाजीनगर परिमंडलात काही थकबाकीदार ग्राहकांकडून झालेल्या शिवीगाळ, धक्काबुक्की, मारहाण प्रकरणांची व्यवस्थापनाने गंभीर दखल घेतली आहे. संबंधित व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून तात्काळ कारवाईसाठी उच्च स्तरावरून तसेच विधी विभागाकडून विशेष पाठपुरावा करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: ७६/२०२५.

अर्जदार : १) बशिराबी सरफराजखा पठाण, वयः ८० वर्षे, धंदाः घरकाम. २) शकीलाबी शेख करीम, वयः ६३ वर्षे, धंदाः मजुरी. ३) शाबासखा सरफराजखा पठाण, वयः ६२ वर्षे, धंदाः शेती. वरील सर्व अर्जदार रा. जामा मस्जीद जवळ, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), ४) निसार खान सरफराज खान पठाण, वय ६० वर्षे, धंदाः मजुरी. रा. आमखास ग्राउंड जवळ, प्लॉट नं. ४१ दिलरस कॉलोनी, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). ५) शमीम बेगम शकील सय्यद, ययः ४० वर्षे, धंदाः घरकाम, रा. घर नं. ९-१-६२, शरीफ कॉलोनी, तलाववाडी, कट कट गेट, सिडको कॉलोनी, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) ६) जकीया बेगम अहेमद खान पठाण, वयः ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा. बालाजी हॉस्पीटल जवळ, डॉ. जाकेर हुसेन नगर, सिल्लोड ता. सिल्लोड जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) ७) वसीम खान अहेमद खान पठाण, वयः ३६ वर्षे, धंदाः वैद्यकीय व्यवसाय, रा. प्याराडाईज मेडीकल समोर, सिल्लोड ता. सिल्लोड जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). ८) नाजीया परवीन अल्ताफ अहेमद खान पठाण, वयः ३४ वर्षे, धंदाः घरकाम, घर नं. ४-७-८२, नवाबपुरा, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). ९) साजिद खान अहेमद खान पठाण, वयः ३२ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. धनवाई हॉस्पीटलच्या जवळ, डॉ. जाकेर हुसेन नगर, सिल्लोड ता. सिल्लोड जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. सरफराजखा मुनीरखा उर्फ खादरखा पठाण हे दिनांकः- ०२/०९/२००२ ला सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक ०५/०४/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः १८/०२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- ८५/२०२५.

अर्जदार : १) रामदास भीला जगताप, वयः ७० वर्षे, धंदाः शेती, २) ज्ञानेश्वर रामदास जगताप, वयः ३५ वर्षे, धंदाः शेती, ३) सागर रामदास जगताप, वयः ३० वर्षे, धंदा शेती, वरील सर्व रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद. ४) ज्योती प्रमोद गंडे, वयः ३२ वर्षे, धंदा शेती, रा. माळ पिंप्री ता. जामनेर जि. जळगांव,

// विरुध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे कै. मथुराबाई रामदास जगताप ही दिनांकः १८/१२/२०२४ ला जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक : १९/०४/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १५/०२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

**मा. विद्यमान दिवाणी न्यायालय (क, स्तर) सोयगांव यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. : ८२/२०२५

१/- कृष्णा रामदास पाटील, वय ५१ वर्ष, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद.

:: विरुद्धः:

निल

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबधितास जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगाव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत रामदास नारायण पाटील हे दिनांक १८.०३.१९८६ रोजी मयत असून त्यांची पत्नी नामे गयाबाई रामदास पाटील हे देखील दिनांक ०८.०१.२०२५ रोजी मयत झालेल्या असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्रं. १ है वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात वकिलामार्फत दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे रामदास नारायण पाटील व गयाबाई रामदास पाटील यांचे वारस असून त्यांना शासकीय / निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालात योग्य त्या कागदोपत्रा सह. आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १७/२/२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले. पुढील तारीखः-७/४/२०२५

आदेशावरून.

(क. लिपिक) — (सहाय्यक अधीक्षक)

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- ७७/२०२५.

अर्जदारः १) इंदल महादु जाधव, वयः ६५ वर्षे, धंदाः शेती, रा. हनुमंतखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद. २) नमोबाई बल्लु चव्हाण, वयः ७६ वर्षे, धंदाः शेती, रा. धाप ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. कै. कमलाबाई महादु जाधव हे दिनांकः १३/०८/२०२२ ला मौजे हनुमंतखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक ०९/०४/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १५/०२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: ६८/२०२५.

अर्जदार : १) कल्पना अरुण सोमवंशी, वयः ५२ वर्षे, धंदाः शेती, २) गोपल अरुण सोमवंशी, वयः ३१ वर्षे, धंदाः- शेती, ३) मयुर अरुण सोमवंशी, वयः २८ वर्षे, धंदाः शेती, सर्व रा. शिंदोळ ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरंक

अर्जः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे, कै. अरूण भावराव सोमवंशी हे दिनांकः २५/१०/२०२४ ला शिंदोळ ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः १७/०४/२०२५).

तरी. ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १५/०२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क ८१/२०२५

अर्जदारः १) संभाजी रामकृष्ण वाघ, वयः ७२ वर्ष, धंदा शेती, २) रायबा रामकृष्ण वाघ, वयः ७३ वर्षे, धंदा शेती. ३) जिवराम रामकृष्ण वाघ, वय ६३ वर्षे, धंदा शेती, ४) मोतीलाल रामकृष्ण वाघ, वयः ५६ वर्ष, धंदा- शेती, ५) सुभाष रामकृष्ण वाघ, वयः ४८ वर्षे, धंदा शेती, ६) पंडीत धनराज वाघ, वयः ३६ वर्षे, धंदाः शेती, ७) अमोल धनराज वाघ, वयः २९ वर्षे, धंदा शेती, सर्व रा. कंकराळ ता. सोयगांव जि. औरंगाबाद

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरंक

अर्जः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारानी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता सोयगांव जि औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे. मथुराबाई रामकृष्ण वाघ हे दिनांकः १६/१२/२००६ ला मौजे कंकराळा ता. सोयगाव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक - ९/४/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १५/०२/२०२५ ला रोजी राही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव, जि. औरंगाबाद

प्रोसेस जमा श्री. पाठक साहेब

## जाहिर नोटीस

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७१ /२०२५

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात**

अर्जदार : १) श्रीमती सुशिलाबाई मांगीलाल चौधरी, २) श्री. दिनेश मांगीलाल चौधरी ३) श्री. किरण मांगीलाल चौधरी, ४) श्रीमती पुजा भागवत उर्फ कंवरलाल चौधरी ५) चि. हेमांशु भागवत उर्फ कंवरलाल चौधरी, ६) चि. भावेश भागवत उर्फ कंवरलाल चौधरी, ७) कु. शिवन्या भागवत उर्फ कंवरलाल चौधरी सर्व रा.आज मुक्काम शिव नगर, मु. पो. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ४३११५०.

-: विरुध्द :-

सामनेवाले- कोणीही नाही

ज्याअर्थी कै. मांगीलाल बाबुलाल चौधरी यांचे दि. ३०/११/२०२४ व भागवत उर्फ कंवरलाल मांगीलाल चौधरी यांचे दि.१०/०१/२०२३ रोजी निधन झाले त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा कै. मांगीलाल बाबुलाल चौधरी व भागवत उर्फ कंवरलाल मांगीलाल चौधरी यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि. १६/०४/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता. १८/०२/२०२५

लिपिक — अधिक्षक

सि.ज. ज्यु. डि सो सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: ०६/२०२५.

अर्जदार : १) छगन सुरा वंजारी, वयः ५२ वर्षे, धंदाः- शेती. २) मगन सुरा वंजारी, वयः ४८ वर्षे, धंदाः शेती. वरील दोन्ही अर्जदार रा. मोहलाई ता. पाचोरा जि. जळगांव. ३) सरलाबाई विजय पवार, वयः ४० वर्षे, धंदाः शेती, रा. पिंपरखेड ता. चाळीसगांव जि. जळगांव,

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. कै. सुरा जयराम वंजारी (राठोड) हे दिनांक ०९/०६/२००४ ला मोहलाई ता. पाचोरा जि. जळगांव येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः २७/०२/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १८/०२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ७९ /२०२५

अर्जदारः- १) गीनाबाई महादू इधाटे वय-७५ वर्ष धंदा-घरकाम २) शंकर महादू इथाटे, वय-५२वर्ष धंदा-शेती ३) भगवान महादू इधाटे वय-५०वर्ष धंदा-शेती १ ते ३ रा.पळाशी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. ४) जिजाबाई कडूबा सपकाळ वय-५६वर्ष धंदा-घरकाम रा.टाकळी अंतुर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५) हिराबाई नथ्थू मोरे वय-५४वर्ष धंदा-घरकाम रा. वडोद ता. कन्नड, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील कै. महादू सांडू इधाटे यांचा दिनांक- १४/०५/२०१९ रोजी वृद्धपकाळाणे मौजे पळाशी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे दारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे कै. महादू सांडू इधाटे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख ०४/०४/२०२५. आज दि. १८/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ३१/२०२५

अर्जदार : १) मिराबाई जगन देवरे वय-७५ वर्ष धंदा-घरकाम २) राजेंद्र जगन पाटील, वय-४८ वर्ष धंदा-शेती ३) गोकुळ जगन देवरे वय-४४ वर्ष धंदा- शेती १ ते ३ रा.गलवाडा (ब), ता.सोयगाव, जि. औरंगाबाद ४) संगीताबाई योगेश पाटील वय-५० वर्ष धंदा-घरकाम ५) कल्पना सुनील पाटील, वय-४२ वर्ष धंदा- घरकाम ४ व ५ रा. कन्हेरे ता. पारोळा जि. जळगाव. ६) उज्वला दिनेश शेवाळे वय-४६ वर्ष धंदा घरकाम रा. कळंभिर ता. साक्री जि.धुळे.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील कै. जगन यादव देवरे यांचा दिनांक-२८/०३/२०२० रोजी मौजे गलवाडा (ब), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे कै. जगन यादव देवरे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ६ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २०/०३/२०२५. आज दि. १३/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय का स्तर सोयगांव

प्रोसेस जमा श्री. पाठक साहेब

## जाहिर नोटीस

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७३/२०२५

अर्जदार : १) श्री. भगवान शेनफडू तेली, २) श्री. पंढरीनाथ शेनफडू तेली, ३) श्री. घनशाम शेनफडू तेली, ४) सौ. नंदाबाई गजानन बिंदवाल, ५) सौ. राजेश्वरी सुरेश असरवाल, ६) सौ. शोभाबाई रमेश तेली, ७) सौ. चंदा जगदीश झलवार सर्व रा.आज मुक्काम बसन स्थानक परिसर, तेली वाडा, मु.पो. वनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ४३११५०.

-: विरुध्द :-

सामनेवाले - कोणीही नाही

ज्याअर्थी कै. शेनफडू महादू तेली यांचे दि. २६/०३/२०१५ रोजी कै. कस्तुरावाई शेनफडु तेली यांचे दि. १७/१२/२०२३ रोजी निधन झाले त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा कै. शेनफडू महादू तेली व कै. कस्तुराबाई शेनफडु तेली यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि.१६/०४/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता. १८/०२/२०२५

लिपिक — अधिक्षक

सि.ज. ज्यु. डि सो सोयगांव

प्रोसेस जमा श्री. पाठक साहेब

## जाहिर नोटीस

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७२/२०२५

अर्जदार : १) श्रीमती शोभाबाई माधवराव चौधरी, २) श्रीमती हर्षदा भारत मावरे, ३) श्रीमती भारती किरण ढाकरे, ४) चि. राजेंद्र माधवराव चौधरी, ५) श्रीमती विद्या ज्ञानेश्वर तेली सर्व रा. आज मुक्काम श्रीराम नगर, मु. पो. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ४३११५०.

-: विरुध्द :-

सामनेवाले - कोणीही नाही

ज्याअर्थी माधवराव सांडू चौधरी यांचे दि. ०५/११/२०२४ रोजी निधन झाले त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा माधवराव सांडू चौधरी यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि १६/०४/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार थाना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे. ही जाहिर नोटीस ता. १८/०२/२०२५

लिपिक — अधिक्षक

सि.ज. ज्यु. डि सो सोयगांव

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३२५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सत्तेसाठी २०१९ मध्ये तुम्ही बाळासाहेबांच्या विचारांना, हिंदुत्वाला डॅमेज केले - एकनाथ शिंदे

मुंबई, १८ फेब्रुवारी : सत्तेच्या खुर्चीसाठी २०१९ मध्येच त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांना डॅमेज केले, हिंदुत्वाला डॅमेज केले, शिवसेनेला डॅमेज केले, आता आभाळ फाटलंय त्याला कुठे कुठे ठिगळ लावणार अशी घणाघाती टीका शिवसेना मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली. उबाठाच्या डॅमेज कंट्रोलबाबत विचारलेल्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी खिल्ली उडवली. मुंबईत त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

ते पुढे म्हणाले की, महाविकास आघाडीसारखा खुर्चीचा अजेंडा नाही तर महायुतीचा अजेंडा हा सर्वसामान्य माणसांच्या जीवनामध्ये बदल घडवणे आणि त्यांना न्याय देणे, राज्याला पुढे नेणे आहे. राज्यातील महत्वाच्या पायाभूत सेवा प्रकल्पांचा आढावा घेणारी एकच वॉर रुम आहे. नवीन वॉर रुम झालेली नाही. शिवसेनेच्या मंत्र्यांकडील खात्यांचा आढावा घेण्यासाठी समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. हा कक्ष वॉर रुमशी संलग्न आहे. त्यामुळे महायुतीत कोल्ड वॉर नाही तर महाराष्ट्र विकास विरोधी लोकांशी वॉर आहे, असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला. शासन निर्णय ३१ ऑक्टोबर २०२३ नुसार उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. ते पुढे म्हणाले की या राज्याचा विकास करणे हाच महायुतीचा अजेंडा आहे. महायुतीमध्ये कोणतीही समांतर यंत्रणा नाही. उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायत्ता कक्षात वैद्यकीय मदतीचे जे अर्ज येतील, त्यांना मदत केली जाईल. यापूर्वी काहीजण मुख्यमंत्री असताना एकदाच मंत्रालयात आले होते याची आठवण उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी करुन दिली. महाकुंभसाठी शिवसेनेचे नेते प्रयागराजला जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. शिवसेना पक्ष हा बाळासाहेबांच्या विचारांचा आणि धर्मवीर आनंद दिघेंच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे. हा पक्ष कार्यकर्त्यांना बळ देणारा आहे. तुम लढो हम कपडा संभालता है या विचारांचा नाही, असे उपमुख्यमंत्री म्हणाले. आज शिवसेनेत मोठ्या संख्येने लोक येत आहेत त्यांचे आम्ही स्वागत करतोय पण ज्यांना सोडून लोक जात आहेत त्यांनी त्यावर आत्मपरिक्षण करायला हवे, असा सल्ला शिंदे यांनी दिला. बंद पडलेल्या किंवा दिवाळखोरीत गेलेल्या कारखान्यांच्या कामगारांना लवकरात लवकर थकीत देणी मिळावीत, यासाठी राज्याच्या 'एमआयडीसी'कडून स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

# कुंभमेळ्यात वाढती गर्दी!
# प्रयागराज संगम रेल्वे स्थानक बंद
## महाकुंभच्या अनियंत्रित गर्दीमुळे घेतला निर्णय

नवी दिल्ली : महाकुंभ स्नानासाठी भाविकांच्या गर्दीमुळे नवी दिल्ली स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीनंतर रेल्वे खूप सावध झाली आहे. प्रयागराज संगम रेल्वे स्टेशन, जे आधी १४ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता, ते आता अनियंत्रित गर्दीमुळे २६ फेब्रुवारीपर्यंत बंद करण्यात आले आहे. रेल्वेने प्रथम १४ तारखेपर्यंत आणि नंतर १६ फेब्रुवारीपर्यंत स्टेशन बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता.

महाकुंभ महोत्सवानंतर, २७ फेब्रुवारीपासून संगम रेल्वे स्थानकावरून गाड्या सुरू होतील. जे लोक सहसा या स्थानकावरून गाड्या पकडत असत त्यांना आता फाफामऊ रेल्वे स्थानकावर पाठवले जात आहे. संगममध्ये स्नान करताना




भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून, प्रयागराजजवळील ९ स्थानकांवरून ये-जा करण्याची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच सुरू राहील.

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील अपघातानंतर, उत्तर रेल्वेने सर्व स्थानकांवर हाय अलर्ट जारी केला आहे. महाकुंभातील गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी एक विशेष कृती आराखडा तयार केला जात आहे. त्याच क्रमाने, उत्तर रेल्वे लखनऊ विभागातील प्रयागराज संगम रेल्वे स्थानक २६ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्यात आले आहे. सर्व स्थानकांना २४ तासांच्या आपत्कालीन योजनेसाठी तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संगमात स्नान करणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी, रेल्वेने जवळच्या ९ स्थानकांवर विशेष ते मेल आणि एक्सप्रेस अशा सर्व गाड्यांना थांबण्याची व्यवस्था केली आहे. या सर्व रेल्वे स्थानकांपासून संगम परिसरात जाण्यासाठी ऑटो, ई-रिक्षा, कॅब आणि बसेस उपलब्ध आहेत. ज्याद्वारे घाटाकडे जाणाऱ्या चालण्याच्या ठिकाणी पोहोचता येते. यानंतर, भाविक काही अंतर चालत जाऊन सहज घाटावर पोहोचू शकतात. याशिवाय, गर्दी पाहता, लोकमान्य टिळक एक्सप्रेससह १५ गाड्या प्रयागराज जंक्शनवर येणार नाहीत. त्यांचा मार्ग बदलण्यात आला आहे.

### त्रिवेणी संगमपासून या स्थानकांचे अंतर

प्रयागराज जंक्शन- ११ किमी, फाफामऊ जंक्शन- १८ किमी, प्रयाग जंक्शन- ९.५ किमी, झुंसी- ३.५ किमी, प्रयागराज छिंकी- १० किमी, नैनी जंक्शन- ८ किमी, प्रयागराज रामबाग -९ किमी अंतरावर, सुभेदार गंज -१४ किमी.

## संघ हीच जीवनगाथा



### अलकः (४४) धारणा

हिंदू राष्ट्राच्या प्रत्येक घटकावर संघ एकात्मतेचा संस्कार करतो. मी वेगळा नाही; मी पृथक नाही; मी स्वतंत्र नाही तर मी राष्ट्र शरीराचा एक अंगमात्र / अवयव मात्र आहे; असा साक्षात्कार प्रत्येक स्वयंसेवकाला झाला तर संघ व हिंदू समाज हे द्वैत समाप्त होईल व संघ म्हणजेच हिंदू समाज हे अद्वैत तयार होईल. अशी संघाची धारणा आहे. म्हणूनच संघाचे हिंदू राष्ट्राचे संघटन हे आधारभूत कार्य आहे. संपूर्ण समाज सुसंघटित करण्याच्या दृष्टीने उपयुक्त कार्यपद्धतीचा केंद्रबिंदू आहे नित्य होणारी शाखा व नैमित्तक कार्यक्रम. या सामूहिक कार्यक्रमातून सामूहिक मन निर्माण होतं; हा मनोवैज्ञानिक सिद्धांत आहे. व असे संस्कारित मन विद्रोही कृत्य करणारच नाही. तो आपल्या रिती व नीतीच्या संस्काराला पायदळी तुडवणार नाही. ही संघ संस्काराची धारणा अधिकाधिक विश्वासू करणे हे स्वयंसेवकाचे संघस्थानाबाहेर ब्रीदवाक्य असेल. राष्ट्रभक्ती प्रेरणा का गान वंदे मातरम हा राष्ट्रधर्म आहे. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## राम मंदिरावरून उडणारे ड्रोन पाडले

अयोध्या : अयोध्येतील राम मंदिर संकुलात गर्दीतून उडणारे ड्रोन पाडण्यात आले आहे. अयोध्येत सोमवारी रामलल्लाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. त्यावेळी संध्याकाळी गेट क्रमांक ३ वर ड्रोन उडत पोहोचला. त्यावेळी ड्रोनविरोधी यंत्रणेने ड्रोन पाडला. यानंतर सुरक्षा कर्मचारी सतर्क झाले. बॉम्ब स्क्वॉड टीमला पाचारण करण्यात आले. ड्रोनची तपासणी करण्यात आली. ड्रोन कॅमेरा उडवणाऱ्या व्यक्तीचा शोध घेतला जात आहे. अयोध्या पोलिसांना संशय आहे की हे चेंगराचेंगरी घडवण्याचे कट असू शकतो. कारण, राम मंदिर परिसरात ड्रोन उडवण्यास मनाई आहे. मंदिरावरून विमानांनाही उड्डाण करण्याची परवानगी नाही.अयोध्येतील कटरा चौकीचे प्रभारी सुनील कुमार यांनी रामजन्मभूमी पोलिस ठाण्यात या प्रकरणी एफआयआर दाखल केला आहे.

## जेसीबीच्या धक्क्याने गॅसवाहिनी फुटली; गॅस पुरवठा खंडीत

ठाणे : ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाची जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू असताना जेसीबीचा धक्का लागून गॅसवाहिनी फुटल्याची घटना मंगळवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घोडबंदर रोडवरील वाघबीळ नाका येथे घडली. यामुळे गॅस गळती होऊन त्याचा फटका ५० ग्राहकांना बसला. दुपारपर्यंत गॅसवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू होते.

घोडबंदर रोडवर वाघबीळ नाका येथे जेसीबीचा धक्का लागून महानगर गॅस वाहिनीमध्ये गळती सुरू झाली. याची माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मिळताच घटनास्थळी महानगर गॅस कर्मचारी व अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. तसेच त्या गॅस वाहिनीचा मुख्य वॉल्व बंद केल्यानंतर दुरुस्तीचे काम महानगर गॅस कर्मचाऱ्यांनी हाती घेतले. या घटनेमुळे वाघबीळ नाका परिसरातील सुमारे ५० ग्राहकांचा गॅस पुरवठा खंडीत झाला. त्या गॅसवाहिनीच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

## केरळ : उर्समध्ये हमासच्या दहशतवाद्यांचे पोस्टर्स

पलक्कड, १८ फेब्रुवारी : केरळच्या पल्लकडमध्ये आयोजित मुस्लिम धर्मियांच्या उर्समध्ये हमासच्या दहशतवाद्यांचे पोस्टर्स झळकवण्यात आल्याची धक्कादायक घटना पुढे आली आहे. यासंदर्भातील व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली आहे. यासंदर्भातील माहितीनुसार १६ फेब्रुवारी रोजी पलक्कड येथील मुस्लिम संत त्रिथला यांच्या समाधीस्थळावर उरुसाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात हजारो लोक होते. त्यानंतर, हत्तींवर हमासचे दहशतवादी इस्माईल हनिया, याह्या सिनवार आणि हिजबुल्लाह प्रमुख हसन नसरल्लाह यांचे पोस्टर्स दिसले. या घटनेचे व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर केरळचे भाजपाध्यक्ष के. सुरेंद्रन म्हणाले की, राज्यातील सीपीआयएम सरकारच्या पाठिंब्याने हे सर्व उपक्रम मतांच्या राजकारणासाठी केले जात आहेत. के. सुरेद्रन यांनी यासंदर्भातील व्हिडीओ देखील पोस्ट केला आहे. या उत्सवात हमासचा इस्माईल हानिया आणि याह्या सिनवार यांचे फोटो हत्तींवर बसून काढण्यात आले, जिथे एक कम्युनिस्ट मंत्री आणि एक माजी काँग्रेस आमदार देखील उपस्थित होते. स्थानिक लोकांच्या मते, हा कार्यक्रम त्रिथला पंचायतीने आयोजित केला होता.

## रोडवरील वीटभट्टीचें अतिक्रमण काढण्यास सुरुवात



तभा वृत्तसेवा

पैठण दि १८ :- पैठण शहागड तसेच पैठण शेवगांव रस्त्यावर असलेल्या शहागड फाट्याजवळील वीटभट्टांचे अतिक्रमण मंगळवार रोजी दुपारी बारा वाजेपासून महसूल, नगर परिषद तसेच पोलीस पथकाच्या संयुक्त मोहिमेत हटवण्यास सुरुवात करण्यात आली.

वाळू प्रमाणे पैठणच्या वीटेला मोठी मागणी असून याचा खूप मोठा व्यवसाय केला जातो परंतु आयटीआय जवळील शहागड फाटा ते वडवाळी तसेच पाटेगाव, चणकवाडी परिसरात अगदी रस्ताच्या कडेपर्यंत काही वीटभट्टी चालकांनी जागा घेरली होती. ज्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता.

यासाठी मंगळवारी तहसीलदार चव्हाण, मुख्याधिकारी संतोष आगळे पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाकडून जिसेबी, ट्रक, ट्रॅक्टरच्या साहाय्याने वरील परिसरातील रोडवरील विटभट्टांचे अतिक्रमण काढण्यास सुरुवात करण्यात आली.













## अग्रलेख...

# बांगलादेशविरोधात भारताची संयमी भूमिका

बांगलादेशमधून शेख हसीना यांची हकालपट्टी झाल्यानंतरही विद्यार्थ्यांचा संताप कमी झालेला नाही. 'जुलै उठाव'चे आंदोलक अलिकडेच आपल्या मागण्या घेऊन बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्या निवासस्थानाबाहेर पोहोचले. विद्यार्थी आंदोलनात जखमी झालेल्या आंदोलकांना योग्य उपचार, पुनर्वसन आणि अधिकृत मान्यता मिळावी, अशी आंदोलकांची मागणी आहे. आंदोलकांनी मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांचे निवासस्थान असलेल्या 'जमुना' या स्टेट गेस्ट हाऊसजवळ जाऊन आपल्या मागण्या मांडल्या. सुरक्षा दलांनी मार्गात बॅरिकेड्स लावून त्यांना अडवले. आंदोलक तेथेच संपावर बसले. नंतर ते बॅरिकेड्?स तोडून मोहम्मद युनूस यांच्या निवासस्थानी पोहोचले. सरकारच्या आश्वासनानंतर आंदोलकांनी आंदोलन संपवले. 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी'च्या नेत्यांची युनूस यांनी सुटका केली. त्यानंतर देशभरात युनूस लवकरच निवडणुका घेतील, अशी अपेक्षा होती; परंतु निवडणूक घेण्याची कोणतीही हालचाल होत नसल्याने 'बीएनपी' त्यांच्यावर नाराज आहे. आपल्या मागण्यांबाबत सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी यापूर्वीच केला होता; मात्र मुख्य सल्लागाराच्या प्रतिनिधीला भेटण्याची मागणीही त्यांनी केली होती. 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी'चे प्रभारी अध्यक्ष तारिक रहमान यांनी म्हटले आहे की, सुधारणांवरील चर्चा ठप्प राहिल्यास हुकूमशहांना संधी मिळेल. सुधारणांबाबतची चर्चा रखडली तर देश गंभीर संकटात जाईल. 'बीएनपी'चे तारिक रहमान अलिकडेच एका कार्यक्रमामध्ये मोहम्मद युनूस यांचे नाव न घेता म्हणाले, सुधारणांची जबाबदारी असणाऱ्यांनी ती सुरू करावी. कोणताही सुधारणा प्रस्ताव लागू करण्यापूर्वी निवडणुका होणे आवश्यक आहे. जनतेने देश चालविण्याची संधी दिल्यास बीएनपी सुधारणांबाबत दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. अंतरिम सरकारने १५ वेगवेगळ्या सुधारणांसाठी आयोग स्थापन केले आहेत. या सुधारणांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुधारणादेखील आहे. या आयोगांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर आणि त्यावर सहमती झाल्यानंतरच या सुधारणा लागू केल्या जाऊ शकतात. निवडणूक प्रक्रियेपूर्वी सर्व सुधारणा राबविता येणार नसून त्या अंमलात आणायच्या असतील तर आणखी सहा महिने लागतील. युनूस यांनी या वर्षाच्या अखेरीस निवडणुका होणार असून आपण देशाच्या एकात्मतेचे रक्षण करत असल्याचे सांगितले. याशिवाय जुलैमधील आंदोलनात सहभागी होणारे विद्यार्थी पक्ष काढू शकतात, असे संकेतही त्यांनी दिले आहेत. कदाचित पक्ष स्थापन करताना त्यांच्यात फूट पडू शकते. शेख हसीना यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात भारताचे बांगलादेशशी अतिशय घनिष्ठ संबंध होते. बांगलादेशचे अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध चढ-उतारांनी भरले आहेत. पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन शेख हसीना भारतात आल्या आणि आजही येथे राहात आहेत. बांगलादेशच्या अंतरिम सरकारला शेख हसीना यांच्यावर गुन्हा दाखल करायचा आहे. मुलाखतीदरम्यान इस्लामिक कट्टरपंथी त्यांच्या देशाचा ताबा घेऊ शकतात आणि भारतासोबतचे संबंध अतिशय नाजूक टप्प्यावर आहेत, अशी भीती आहे का, असे विचारण्यात आले तेव्हा मोहम्मद युनूस म्हणाले, 'मला अशी कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. तरुणांचा राजकीय करीअर करण्याचा कोणताही हेतू किंवा वैयक्तिक स्वार्थ नाही. ते राजकीय पक्ष बनवत आहेत. त्यांनी आपल्या रक्ताने देश वाचवला असल्याने याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा, पूर्वीच्या कारकीर्दीची पुनरावृत्ती करण्याची संधी शोधणाऱ्यांनी त्यांना दूर केले असते.' पश्चिम बंगालला लागून असलेल्या भारत आणि बांगलादेशच्या सीमेवर तणाव आहे. अनेकदा दोन्ही बाजूंचे ग्रामस्थ आमनेसामने येत आहेत. कधी-कधी सीमेवर तैनात असलेले सुरक्षा दल समोरासमोर येत आहेत. त्यामुळे सीमेजवळ राहणारे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. बांगलादेशच्या अंतरिम सरकारमधले लोक भारताबाबत अतिशय आक्रमक विधाने करीत आहेत; पण भारत सरकारकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय संतुलित आहे. हे स्पष्ट करणारी घटना पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यातील सुखदेवपूर ग्रामपंचायतीमध्ये घडली. बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या सुखदेवपूर येथील बकराबाद गावात राहणारे ग्रामस्थ नेहमीप्रमाणे आपल्या शेतात कामासाठी गेले होते. त्यांचे शेत बांगलादेश सीमेच्या 'शून्य रेषेच्या' १५० मीटर आत आहेत. येथे काटेरी कुंपण आहे; मात्र एक किलोमीटरचा परिसर असा आहे की, जिथे काटेरी कुंपण नाही. अनेक शेतात गव्हाचे पीक आलेले ग्रामस्थांनी पाहिले. येथे आंब्याची मोठी बागही आहे. त्यात सुमारे ९०० झाडे आहेत. यापैकी अनेक झाडे तोडल्याचे आढळून आले. गावकऱ्यांनी 'झीरो लाईन'जवळ तैनात 'बांगलादेश बॉर्डर गार्डस'च्या (बीजीबी) जवानांना ही माहिती दिली; पण काही वेळातच सीमेच्या पलीकडे लोकांचा जमाव जमला. भारतीय बाजूचे ग्रामस्थही तेथे जमले. सीमेपलीकडे जमलेल्या जमावाने त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप सुखदेवपूरच्या ग्रामस्थांनी केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि 'बीजीबी'च्या जवानांनी नियंत्रणात आणली. या घटनेपूर्वी ६ जानेवारीला 'बीएसएफ' आणि 'बीजीबी' जवानांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यावेळी भारताच्या बाजूने काटेरी कुंपण उभारण्याचे काम सुरू करण्यात आले होते. ही घटनाही त्याच ठिकाणी घडली, ज्या ठिकाणी काटेरी तारा लावण्याचे काम सुरू आहे. ती जागा 'झीरो लाईन'पासून १५० मीटरपेक्षा कमी त्रिज्येत आहे, असे सांगत 'बीजीबी'ने आक्षेप घेतला होता. यानंतर दोन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'फ्लॅग मीटिंग' बोलाविण्यात आली. वायरिंगचे काम सध्या रखडले आहे. भारत आणि बांगलादेशदरम्यानच्या पश्चिम बंगालच्या सीमेवर अशी अनेक ठिकाणे आहेत, जिथे गेल्या दोन महिन्यांमध्ये दोन्ही देशांच्या सुरक्षा दलांमध्ये तणावाच्या अशाच घटना घडल्या आहेत. सततच्या तणावामुळे गेल्या काही दिवसांपासून दोन्ही देशांच्या सीमेवर तैनात सुरक्षा दलांच्या अधिकाऱ्यांच्या नियमित बैठकाही होत आहेत. पश्चिम बंगालच्या बांगलादेश सीमेवर जवळपास प्रत्येक सीमा चेक पोस्टवर अशाच प्रकारच्या 'फ्लॅग मीटिंग' आयोजित केल्या जात आहेत, जेणेकरून तणाव संपुष्टात यावा. 'बीजीबी' प्रमुख मेजर जनरल अशरफुज्जा सिद्दीकी भारत दौऱ्यावर येत आहेत. यादरम्यान ते सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक दलजित सिंग चौधरी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. दोन्ही देशांमधील सीमेवरून निर्माण झालेल्या वादावरही चर्चा होणार आहे. सुखदेवपूरचे बकराबाद हे गाव मालदा जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ४५ किलोमीटर अंतरावर आहे. सीमा भागातून जाणाऱ्या रस्त्यावरून जाण्यास सध्या बंदी आहे. दुसरा मार्ग कालियाचक मार्गे जातो. सध्या काटेरी तार नसलेल्या भागाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. हा परिसर दुकानापासून फक्त ४०० मीटर अंतरावर आहे. सुखदेवपूरसह मालदा जिल्ह्यातील इतर भागांत बांगलादेशच्या सीमेवर घडणाऱ्या घटनांमुळे स्थानिक लोक खूप चिंतेत आहेत. अशा वाढत्या घटनांदरम्यान नुकतेच मालदा दौऱ्यात राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सीमेजवळ राहणाऱ्या गावकऱ्यांना आंतरराष्ट्रीय सीमेपासून अंतर राखण्याचा सल्ला दिला होता. वाढत्या वादांच्या पृष्ठभूमीवर सीमा सुरक्षा दलाने सीमेवरील तस्करांविरुद्ध मोहीम तीव्र करण्याचा दावा केला आहे. दक्षिण पश्चिम बंगालमधील विविध ठिकाणांहून सुरक्षा दलांनी विशेष मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त केल्याचे 'बीएसएफ'चे म्हणणे आहे. बांगलादेशवर दीर्घकाळ नजर ठेवणाऱ्या तज्ज्ञांना वाटते की, भारत सरकार यावेळी संयमाने वागत आहे. अंतरिम सरकार सार्वत्रिक निवडणुका घेण्यास नाखूश आहे. निवडणुकांच्या मागणीवरून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवता यावे यासाठी भारताच्या सीमेवर आक्रमक भूमिका दाखवत असल्याचे त्यांचे मत आहे. सीमेवर संघर्ष वाढला आणि भारताने प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली, तर बांगलादेशाच्या अंतरिम सरकारला हवे आहे ते होईल. भारताने आतापर्यंत घेतलेली भूमिका हे स्पष्टपणे दर्शवते की, तो बांगलादेश सरकारच्या या फंदात पडणार नाही.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# चाळावी इतिहासाची पाने

लोकसभेत राष्ट्रपतींचे आभार मानण्याच्या निमित्ताने बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे डेमोक्रॅट अध्यक्ष जॉन एफ. केनडी यांच्या विषयीच्या 'फरगॉटन क्रायसिस' या पुस्तकाचा उल्लेख केला. हे पुस्तक एका निवृत्त सीआयए या गुप्तहेर खात्याच्या अधिकाऱ्याने लिहिलेले आहे. यात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी काही उल्लेख आहेत. हे उल्लेख १९६२ च्या चिनी आक्रमणाच्या संदर्भातले आहेत. याचवेळी अमेरिकेशेजारच्या क्युबाला रशियन अण्वस्त्रे पुरविण्याचा मुद्दाही निकरावर आला होता. याचा उल्लेख 'क्युबन मिसाईल क्रायसिस' असा केला जातो. रशिया आणि अमेरिका यात संघर्षाची ठिणगी उडणार अशी भीती सर्व जगाला वाटू लागली होती. भारत आणि चीन यातही याचवेळी सीमा संघर्ष निर्माण झाला होता. ब्रुस रिडेल नावाच्या सीआयए अमेरिकन गुप्तहेर खात्यातील अधिकाऱ्याने यावर एक पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे नाव 'जेकेएफज फरगॉटन क्रायसिस : तिबेट, दी सीआयए ॲण्ड दी सिनो इंडियन वॉर' असे लांबलचक आहे. या पुस्तकात अमेरिकन दृष्टिकोनातून भारत-चीन युद्धाबाबत सविस्तर माहिती दिली आहे. सीआयएमध्ये वरच्या आणि महत्त्वाच्या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याने नमूद केलेला हा वृत्तांत अर्थातच खूप महत्त्वाचा आहे. ही माहिती आणि पंडित नेहरू आणि जॉन एफ. केनडी यांच्यातील पत्रव्यवहार त्यावेळी गुप्त ठेवण्यात आला होता. पुढे हा डीक्लासिफाय (उघड) करण्यात आला. ब्रुस रिडेल यांचे पुस्तक २०१६ मध्ये भारतात उपलब्ध झाले होते. या पुस्तकातील माहिती अभ्यासकांसाठी खूप महत्त्वाची आहे. १९६२ मध्ये भारत-चीन युद्धात भारताचा मान खाली घालायला लावणारा पराभव झाला होता. या विषयीचे तपशीलवार 'आतले' वृत्त 'जेकेएफज फरगॉटन क्रायसिस : तिबेट, दी सीआयए ॲण्ड दी सिनो इंडियन वॉर' या पुस्तकात आहे. १९६२ नंतर काही माहिती झिरपत बाहेर आली होती. भारताची त्यावेळी पर्वतीय क्षेत्रातील युद्ध लढण्यासाठीची सिद्धता अगदीच अपुरी होती. बर्फात लागतात तसे जोडेसुद्धा आपल्या सैनिकांच्या पायात नव्हते. ते साधे कॅनव्हासचे जोडेच वापरत असत, या शब्दात आपल्या सैनिकी तयारीचे वर्णन चेष्टेने केले जायचे. कालबाह्य झालेली बंदूकच आपल्या सैनिकांजवळ होती. १९ नोव्हेंबर १९६२ ला नेहरूंनी केनेडी यांना पत्र लिहून मदतीसाठी विनंती केली. क्युबाप्रकरणी गुंतलेले असूनसुद्धा केनेडी यांनी नेहरूंच्या पत्राची तातडीने दखल घेतली आणि मदतीचे आश्वासन दिले. भारताने हव्या असलेल्या सैन्यसामग्रीची तपशीलवार आणि लांबलचक यादी अमेरिकेकडे पाठविली. भारताने पाठविलेली यादी भारतीय साडीसारखीच लांबलचक आहे, अशी अमेरिकेत त्यावेळी चेष्टा झाली, असे म्हणतात. केनेडी यांनी सुचविले की, या सामग्रीची किंमत खूप मोठी होईल. भारतीय अर्थकारणावर यामुळे खूप ताण पडेल, म्हणून हे साहित्य आम्ही तुम्हाला भाडेतत्त्वावर देतो. युद्ध संपले की, भाड्यासह ती तुम्ही आम्हाला परत करा. युद्धात वापरल्या गेलेल्या सामग्रीचेच पैसे आम्हाला द्या. असे म्हणतात की, त्याकाळी शस्त्रसामग्री घेऊन येणारी विमाने दर पाच मिनिटांच्या कालांतराने कोलकाता विमानतळावर उतरत होती. ही बातमी भारतीय वृत्तसृष्टीने प्रसारित करताच 'त्यांनी असे करू नये, अशाने ही माहिती शत्रुपक्षालाही कळते' असे आवाहन सरकारच्या वतीने करण्यात आले होते.

केनेडी यांच्या १९६१ ते १९६३ या कार्यकाळात जॉन केनेथ गेलब्रेथ हे अमेरिकेचे भारतातील राजदूत होते. भारत आणि अमेरिका यांच्यात स्नेहाचे संबंध असावेत यासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न केले. आर्थिक बाबतीत ते नेहरूंना सल्ला देत असत, चीन-भारत यांच्या १९६२ च्या सीमायुद्धाच्या काळात त्यांनी अमेरिकेने भारताला साथ द्यावी यासाठी मनापासून प्रयत्न केले होते. १९६२ मध्ये भारताकडून दोन पत्रे अमेरिकेकडे रवाना झाली होती. त्यांचा तपशील तेव्हा गप्तप्त ठेवण्यात आला होता. अशी पत्रे आम्ही पाठविलीच नव्हती, असे भारत अनेक वर्षे सांगत होता. अमेरिकेने पत्रे आली होती हे स्पष्ट केले, पण तपशील उघड केला नाही. २०१० साली ही पत्रे अमेरिकेने जाहीरपणे उघड केली. त्यातील मजकुराचा सारांश काहीसा असा आहे- 'भारताला बॉम्बफेकी विमाने, रडार, शहरांचे व कारखान्यांचे संरक्षण करणाऱ्या यंत्रणांची आवश्यकता आहे. चीनची शस्त्रास्त्र तळे अमेरिकेने नष्ट करावीत, अशी अपेक्षा भारताने व्यक्त केली होती. चीनचा हल्ला हे केवळ भारतावरचेच संकट नाही, तर हा मुद्दा या भागातील इतर देशांच्या स्वातंत्र्याशीही संबंधित आहे. आम्हाला पुरविली जाणारी शस्त्रे फक्त चीनच्या विरोधातच उपयोगात आणली जातील. 'टॉप सिक्रेट' असा शिक्का मारलेली ही दोन्ही पत्रे आज ब्रुस रिडेल यांच्या पुस्तकाच्या एका आवृत्तीत १३४ व १३५ या पानांवर उपलब्ध आहेत.

मोदींनी संसदेत केलेल्या भाषणातला आणखी एक उल्लेख प्रसिद्ध व्यंग्यचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंग्यचित्राचा होता. यात आर. के. लक्ष्मण यांचा 'कॉमन मॅन' एक (ठेला) खटारा ओढताना दाखविला आहे. या खटाऱ्यावर एक विमान दाखविले आहे. विमानाच्या खिडक्यातून आत बसलेले प्रवासी त्यावेळच्या राजकारण्यांची आठवण करून देतात तर पायलट त्यावेळच्या पंतप्रधानांसारखा (राजीव गांधी) तोंडवळा असलेला दिसतो आहे. चित्राच्या शिरोभागी शीर्षक आहे- 'दी फ्लोट दॅट वॉजंट देअर.' खटाऱ्यावर लिहिले आहे- 'ॲन एक्सायटिंग ट्रिप टू २१ सेंच्युरी.' त्याच्याखाली लांबलचक टीप आहे- 'इन कोलॅबोरेशन विथ जपान, यूएसए, यूके, जर्मनी, इटली, यूएसएसआर, कॅनडा एटसेटरा, एटसेटरा.' मोदींच्या भाषणानंतर हे व्यंग्यचित्रही वृत्तसृष्टीने पुन्हा प्रसारित केलेले दिसते. त्यावेळच्या महत्त्वाकांक्षा मोठ्या होत्या, पण साजेसे प्रयत्न?, त्याची वानवा होती. लाकडी खटारा ओढणारा 'कॉमन मॅन', शिरोभागी २१ वे शतक, पण विमान जमिनीवरच नव्हे खटाऱ्यावरच आहेत, म्हटले तर प्रवासी व पायलट पण साम्य तत्कालीन राजकारण्यांशी अशी वैशिष्ट्ये दाखवणारे व्यंग्यचित्रकाराचे फटकारे विनोदाबरोबरच आणखी बरेच काही सांगून जातात. मोदींनी कुणाचेही नाव घेतलेले नाही. सतत २१ वे शतक असा धोशा लावणारा पंतप्रधान एवढाच उल्लेख त्यांनी केला आहे. त्याकाळी हे व्यंग्यचित्र बरेच गाजले. नंतर आजही ते 'क्रियेवीण व्यर्थ वाचाळतेचे' लक्तरे तोडणारे ठरले आहे. ज्या गोष्टी दशकांपूर्वी व्हायला हव्या होत्या, त्या आज होत आहेत, हे बघून संवेदनशील मनाला काय वाटत असेल बरे? आम्हाला संधी मिळताच आम्ही मात्र राष्ट्र उभारणीच्या कामात स्वत:ला झोकून दिले आहे, असे जे मोदी म्हणाले, ते काय उगीचच! राष्ट्रपती मुर्मू यांनी संसदेला आणि देशाला उद्देशून केलेल्या उद्बोधनाबद्दल त्यांचे आभार मानणाऱ्या प्रस्तावावर भाषण करताना मोदींनी 'जेकेएफज फरगॉटन क्रायसिस : तिबेट, दी सीआयए ॲण्ड दी सिनो इंडियन वॉर' या पुस्तकाचा आणि आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंग्यचित्राचा (कार्टून) फक्त उल्लेख केला. जुन्या नेतृत्वाच्या चुकांवर आणि त्यांच्या ऱ्हस्व दृष्टीवर त्यांनी टीका केली. मोदींचे भाषण ऐकताना एनडीएचे सदस्य हसत जल्लोष करीत होते तर विरोधकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत होत्या. रंजकता आणि बोधप्रदता ही मोदींच्या भाषणाची दोन प्रमुख वैशिष्ट्ये याही भाषणाच्या निमित्ताने प्रत्ययाला आली.

९४२२८०४४३०

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# मजुरांअभावी धान्य गोदाम रिकामे होईल!

एकाने करावे काम । दुसऱ्याने करावा आराम । हे तो आहे हराम । देशहिताच्या दृष्टीने ॥ दुनिया आहे कष्टिकांची। जो जो कसेल शेती त्याची । जो काम करील लक्ष्मी तयाची । दासी व्हावी नियमाने ॥ अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून मांडली आहे. मात्र प्रत्यक्षात आपल्याच देशात दुर्दैवाने का असेना पण आळशी लोकांची संख्या वाढली आहे. याच कारणाने शेतात काम करण्यासाठी शेतमजूर मिळत नसल्याच्या भयावह स्थितीचा सामना शेकडो शेतकरी रोज करीत आहेत. अशा अवस्थेत मजूर न मिळाल्यास शेती करणार कशी? अन्नधान्याचे उत्पादन होणार कसे? कारखाने चालणार कसे? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. समजा शेतमजूर मिळणार नाही तर शेतमालाचे उत्पादन घटेल. सरकारची धान्य गोदामे रिकामी होतील अन् मग नाईलाजाने का असेना धान्य देणे सरकारला बंद करावे लागेल किंवा त्यात घट केली जाईल. अशा महत्त्वपूर्ण समस्येवर उत्तरे शोधण्याची गरज आज निर्माण झाली आहे. तत्पूर्वी शेतमजूर किंवा कुठल्याही कार्यासाठी मजूर का मिळत नाही, याचीही कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. सरकार कुठलेही असो, त्यांना लोककल्याणकारी भूमिका प्रत्यक्ष अमलात आणावीच लागते. तशीच लोककल्याणकारी भूमिका अंत्योदय योजनेच्या माध्यमाने शासनाने प्रत्यक्षात आणली आहे. आता ही योजना आल्याने गहू, तांदूळ, डाळ आदी दैनंदिन गरजेसाठी लागणारे धान्य सहजतेने शासनानेच दिल्याने घरातील कर्ता पुरुष काम कशाला करायचे म्हणून आळशी बनत चालला आहे. आता तर त्याला वाटते की, काम करायची गरजच नाही. पूर्वी हा प्रकार महाराष्ट्रापुरता मर्यादित होता. आता तर संपूर्ण देशातच मजुरांची वानवा निर्माण झाली आहे. कुठल्याही राज्यात जा, तेथील शेतकरी, कारखानदार मजूर नसल्याची खंत बोलून दाखवीत आहेत. सुमारे १४० कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात मजूर मिळत नाही हे मनाला पटण्यासारखे नाही. पण प्रत्यक्षात हे कटू वास्तव आहे. पूर्वी महाराष्ट्रात मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेशातील मजूर मोठ्या प्रमाणात यायचे आणि रग्गड पैसा कमावून आनंदात जीवन जगायचे. आता तेही मजूर महाराष्ट्रात यायला नकार देतात. समजा ते आले तर अर्धवट काम सोडून पळून जातात. हा फार मोठा प्रश्न निर्माण झाल्यावर यावर चिंता व्यक्त करीत बसण्यापेक्षा रामबाण उपायच करायला हवेत.

सरकारने आपल्या लोककल्याणकारी योजना बंद कराव्यात, अशी मागणी केली तर ज्यांना खरोखरच गरज आहे ते मदतीपासून वंचित होतील. समजा या योजना सुरूच राहिल्या तर लोक घरीच बसून मस्तपैकी मजा मारतील. अशा दुष्टचक्रातून बाहेर पडायचे असेल तर संपूर्ण देशात युद्धपातळीवर श्रमप्रतिष्ठा लोकांना पटवून द्यायला हवी. दररोज देशात धार्मिक कार्यक्रम होत असतात. त्या माध्यमाने आळस झटकून काम करा, असे आवाहन वारंवार करायला हवे.

जलसंपदा विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील रामटेक शाखा कार्यालयात सन १९९० मध्ये उप अभियंता रशीद कार्यरत होते. तेव्हा बहुतांश चालक आणि वाहक रिकामे बसून महाराष्ट्र शासनाकडून पगार घ्यायचे. हा प्रकार संबंधित अभियंता रशीद यांना खटकत होता. त्यांनी तातडीने आपल्या पातळीवर निर्णय घेत जलसंपदा विभागाच्या वसाहतीत वृक्षारोपण करीत त्यांचे संगोपन करण्याचे कार्य चालक आणि वाहकांवर सोपवले. प्रथमत: आळशी झालेल्या चालक-वाहकांनी विरोध केला पण उप अभियंता रशीद आपल्या निर्णयावर ठाम राहिले अन्?? खऱ्या अर्थाने एक अनोखा उपक्रम जलसंपदा विभागात यशस्वी झाला. अर्थात कुठल्याही कर्मचाऱ्याने काम न करता पगार घ्यावा ही बाब त्यांना पटली नाही. मग आपण काम न करता केवळ सरकारकडून अन्नधान्य घ्यायचे आणि दिवसभर पानटपरीवर बसून, मोबाईल पाहण्यातच वेळ गमवायचा का? समजा हे दुष्टचक्र असेच सुरू राहिले तर एक दिवस सरकारी गोदामातील अन्नधान्यही संपेल. मग सरकार तुम्हाला अंत्योदय अंतर्गत धान्याचा कुठून पुरवठा करणार आहे. एक सांगतो, हा प्रकार जास्त दिवस चालूच शकत नाही. कारण सरकारकडे जे काही धान्य गोळा होते ते आपल्याच देशातील शेतकऱ्यांनी, शेतमजुरांनी घाम गाळल्यानंतर उत्पादित होते तेच असते. आता शेतमजुरांनी शेताकडे पाठ वळविल्याने उत्पादनात घट शंभर टक्के होणारच आहे. पर्यायाने शेतकरी शेतमाल कुणालाही न विकता स्वत:च त्याचा उपयोग करतील. परिणामी सरकारचे धान्य गोदाम रिकामे राहतील. त्याचा विचार करता आळस झटकून शेतमजुरांनी कामाला लागावे, हीच माफक अपेक्षा.

९८८१७१७८५९

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# विकसित भारत २०४७ : आवश्यकता आणि शक्यता

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन्? यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मांडलेला अर्थसंकल्प व त्यातील विविध तरतुदींवर अद्याप चर्चा सुरूच आहे. सरकारच्या अर्थसंकल्पात आर्थिकच नव्हे, तर सामाजिक व राजकीय पैलू असणे अपरिहार्य असते. यावेळी या प्रमुख तीन मुद्यांच्या जोडीलाच विविध राज्यांमध्ये होणाऱ्या वा होऊ घातलेल्या राजकीय निवडणुकांची सांगड अर्थसंकल्पातील तरतुदींशी घातली गेली. असे करणे किती चूक अथवा बरोबर आहे हा मुद्दा बाजूला ठेवला, तरी अर्थमंत्र्यांसह स्वतः पंतप्रधानांनी पण नमूद केल्यानुसार यावेळचा अर्थसंकल्प हा मोदी सरकारद्वारा प्रस्तावित देशाच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात म्हणजेच २०४७ पर्यंत खऱ्या अर्थाने विकसित भारत घडविण्यासाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. नेमका हाच मुद्दा अर्थसंकल्पादरम्यान व त्यानंतर दुर्लक्षित राहिला असला, तरी त्यावर अधिक विस्तृत व साधक-बाधक चर्चा करणे मात्र तेवढेच आवश्यक ठरते.

'विकसित भारत : २०४७' या राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या व महत्त्वाकांक्षी संकल्पनेची पृष्ठभूमी म्हणजे १५ ऑगस्ट २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वार्थाने विकास झालेला असा विकसित भारत २०४७ मध्ये म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात प्रत्यक्षात साकारण्याचा संकल्प सोडला. यापूर्वी स्वातंत्र्योत्तर काळात एकदाच म्हणजे १९५६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचा विकास साधण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर पंचवार्षिक योजनेची मुहूर्तमेढ रोवली होती, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. जवाहरलाल नेहरू यांनी अशा प्रकारे देशाला राजकीय स्वातंत्र्यानंतर आर्थिक व विकासाचे स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सुरू केलेल्या पंचवार्षिक योजनेला इंदिरा गांधींच्या कार्यकाळात घरघर लागली. यातूनच इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांनी १९६९ मध्ये देशातील निवडक व प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा आर्थिक निर्णय घेतला व तेवढ्यानेच भागले नाही असे वाटून इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये संपूर्ण देशावर आणिबाणी लादण्याचा राजकीय निर्णय घेतला व त्याच दरम्यान नेहरूंनी सुरू केलेल्या पंचवार्षिक योजनांची इतिश्री झाली, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. आता मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी औद्योगिकदृष्ट्या उत्पादक व आर्थिकसंदर्भात उपयुक्त अशा विकसित भारताची संकल्पना मांडली आहे. आर्थिक-औद्योगिक विकासाच्या इच्छाशक्तीला राजकीय स्थिरता, नेतृत्वाची क्षमता व प्रशासनिक तत्परता या बाबी आवश्यक असतात. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपा सरकारकडे या बाबी आहेत, ही जमेची बाजू ठरते. या बाबींची नोंद आंतराष्ट्रीय स्तरावर पण घेण्यात आली आहे.



आंतरराष्ट्रीय व्यवसाय व आर्थिक स्थितीच्या संदर्भात साशंकता असण्याच्या पृष्ठभूमीवर भारताच्या आगामी २५ वर्षांनंतरचे विकासाचे चित्र काय असू शकेल, याबद्दल जागतिक बँकांसह कथित प्रगत देश व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अर्थशास्त्रज्ञ साशंक होते. मात्र, सातत्याने तीन वर्षे सकल घरेलू उत्पादनांमध्ये झालेली वाढ व या वाढीसह आर्थिक क्षेत्रात भारताने घेतलेली व टिकविलेली आघाडी पाहता भारत आणि भारतीय यांच्या संदर्भात शंका घेणाऱ्यांचे शंकास्वर आता थंडावले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील वित्तीय संस्था व या विषयातील विषयतज्ज्ञांच्या मते भारताची ही आर्थिक व विकासविषयक आघाडी २०२९ पर्यंत कायम राहील, अशी स्थिती आताच भक्कमपणे निर्माण झाली आहे.

या साऱ्या पृष्ठभूमीवर २०४७ मधील विकसित भारत कसा असेल अथवा असू शकेल याचा विचार करणे आता व्यावहारिक व शक्य झाले आहे. यासाठी देशांतर्गत सध्या असणारी ३.१ ही विकासाची टक्केवारी त्यासाठी आगामी सुमारे २४ वर्षे साध्य करणे व कायम राखणे अत्यावश्यक ठरते. असे झाले तरच २०४७ मध्ये विकसित भारताचे ध्येय साध्य केले जाऊ शकते. यावर प्रश्न पडतो की, विकासाची वर नमूद केल्याप्रमाणे टक्केवारी सातत्याने व कशा प्रकारे साधली जाऊ शकेल? या शंका वा प्रश्नाच्या उत्तरासाठी सद्य:स्थितीतील भारताच्या कामगिरीचा आढावा घेणे अर्थातच आवश्यक ठरते. यासंदर्भातील मोठी व महत्त्वाची बाब म्हणजे १९८१ ते २०२३ या ३० वर्षांहून अधिक व प्रदीर्घ काळात भारताचा सरासरी वार्षिक विकास दर ४ टक्के राहिला आहे. भारतासाठी ही बाब मोठी जमेची बाजू ठरते. वरील कालावधीत कोरोना काळाचा समावेश व त्यापोटी आलेली आर्थिक अस्थिरता या साऱ्या बाबी असताना भारताने साधलेला सातत्यपूर्ण विकास दर लक्षणीय ठरतो.

यासंदर्भात जागतिक बँकेंतर्गत प्रकाशित झालेल्या दक्षिण आशियाविषयक २०२४ मधील विशेष अभ्यास-अहवालानुसार राष्ट्रीय विकास दर वाढवून प्रदीर्घ काळ कायम राखण्यासाठी दक्षिण कोरियाच्या १९६०-१९८० या दोन दशकातील विकास दराचा दाखला देत भारताला सावध राहण्याचा वा अधिक काळजी घेण्याचा सल्ला याचा इशारा देण्यात आला आहे. या अहवालात रोजगार आणि उत्पादकता याद्वारे विकास दर साधण्यावर जोर देण्यात आले आहे.

विकास व विकास दराच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय संदर्भात तुलनात्मक आकडे व टक्केवारीच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार १९६० मध्ये जे वार्षिक दरडोई उत्पन्न होते ते साध्य करण्यासाठी भारतीय उपखंडातील भारतासह बांगलादेश, नेपाळ व पाकिस्तान या देशांना २०२२ पर्यंत प्रयत्नांसह वाट पाहावी लागली. यामागे कोरियातील रोजगार व वाढती उत्पादकता ही मुख्य कारणे असल्याचे नमूद करण्यात आले होते.

जागतिक बँकेकडे आर्थिक-औद्योगिक विकासाच्या संदर्भात उपलब्ध आकडेवारीनुसार सद्य:स्थितीत भारताच्या विकासाची तुलना कोरियाशी करणे सहज शक्य आहे. तुलनात्मक संदर्भात सांगायचे म्हणजे कोरियाने १९६० ते १९८० या कालावधीची तुलना भारताने आर्थिक-औद्योगिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीची भारताने २००० ते २०२२ या कालावधीत केलेल्या आर्थिक प्रगतीशी सहजपणे करता येते. त्याच दरम्यान उत्पादन व कामगारांच्या उत्पादकतेची पण कोरिया व भारत यांची तुलना करता येईल. थोडक्यात आकडेवारीमध्ये वरील कालावधीत उत्पादन क्षेत्र व कामगारांची उत्पादकता ६.१ टक्के होती तर भारताच्या संदर्भात हीच आकडेवारी होती ५.३ टक्के. सद्य:स्थितीत व विकसित भारताच्या संदर्भात विचार करताना ही वस्तुस्थिती व टक्केवारी भारताच्या संदर्भात निश्चितच जमेची बाजू ठरते. हीच बाब उत्पादन-कामगार क्षेत्रातील महिलांच्या वयोगटाच्या संदर्भात दिसून अपेक्षित विकास दर साधण्यासाठी २०२२-२३ या वर्षात कोरियातील २५ वर्षे वयाखालील टक्केवारी ४१.७ होती तर याच आर्थिक वर्षात अशा वयोगटातील महिलांची टक्केवारी होती ४१.९. यावरून उत्पादन क्षेत्रातील युवा वर्गाच्या टक्केवारीवर विकसित भारताच्या संदर्भात बोलताना पंतप्रधानांचा का म्हणून आग्रही भर असतो ते स्पष्ट होते. थोडक्यात म्हणजे आगामी सुमारे २०-२२ वर्षांनंतर विकसित भारत हे नरेंद्र मोदींची कल्पना म्हणजे एक आव्हानात्मक शक्यता म्हणावी लागेल. याकडे 'पळते ध्येय' म्हणूनही पाहता येईल. मात्र, आजची भारताची आर्थिक-औद्योगिक प्रगती व भारतीयांची क्षमता २०४७ मधील विकसित भारताचे ध्येय हे कठीण वाटत असले, तरी अशक्य मात्र नाही. विकसित भारताची शक्यता साधण्यासाठी तशा मानसिकतेची आवश्यकता मात्र आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### कल्याणकारी योजनेत लाभार्थीपेक्षा अपात्र भरपूर

शासनाने अनेक वंचित वर्गासाठी विविध योजना आणल्या आहेत. या माध्यमातून लोककल्याणकारी योजना थेट जनतेपर्यंत पोहचू लागल्या आहेत, शेवटच्या घटकापर्यंत योजनेचा लाभ मिळावा हा उद्देश आहे. परंतु शासनाच्या योजना येताच अनेक लाभ घेणारे कोणत्याही निकषात बसत नसतानाही या योजनेचा लाभ घेतात. योजेनेच्या सूचना, नियमावली यात तडजोड करून त्यामध्य खोटे कागदी पुरावे सादर करून लाभ घेणारे दिसून येतात. त्यामुळे शासनाच्या योजनांचा घोटाळा सहज दिसून येतो. शासनाच्या विशिष्ट कल्याणकारी योजनेत वंचित वर्गाला लाभ झाला तर हरकत नाही, परंतु लाभ मिळावा म्हणून खोटी कागदपत्रे सादर करून लाभ घेणारे अनेक आहेत. त्यांच्यावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे.शासनाकडे संपूर्ण जनतेचा डेटा असून देखील लोककल्याणकारी योजनेत अनेक घोटाळे उघडकीस येत आहे. असे होऊ नये यासाठी शासनाने पूर्व नियोजन केले पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### गजानन महाराज बुद्धी द्या! वसुंधरा सुंदर राहू द्या!

गजानन महाराजांचा प्रकट दिन जवळ येतो आहे. महाराजांवरील भक्तांचे प्रेम दिवसेंदिवस वाढत आहे आणि महाराज सगळ्यांना सांभाळून घेत आहेत. अन्नाची उरलेली शीतं खाऊन अन्न बचतीचा मौलिक संदेश देणारे महाराज आज कुठेतरी व्यथित होत असतील. भक्तांच्याच पैशाने भक्तांच्याच पोटात विष घालताना महाराजांना निश्चितच वाईट वाटत असेल. गजानन महाराज मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी हे समजून घेतले पाहिजे की आपण देत असलेला प्रसाद प्लॅस्टिकच्या किंवा थर्माकोलच्या डिशमध्ये देत असू तर तो प्रसाद नसून भक्ताला दिलेले विष आहे. त्याच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे. पाणी पिऊन फेकून देण्यात येणारे हजारो प्याले परिसरातील दृश्य खराब करतात. डिस्पोजेबलमुळे शहर, गाव अस्वच्छ होत आहे. या अस्वच्छतेची महाराजांना निश्चितच अपेक्षा नाही. स्वतः गजानन महाराज मंदिर संस्थान शेगाव याबाबतीत आदर्श घालून देत आहे. श्री क्षेत्र माहूर येथे मिळणारा प्रसाद सुद्धा स्टीलच्या ताटवाटीवर मिळतो. ही ताटवाटी घासून तुम्हाला

## वाचक पत्रे



परत करावी लागते. स्वच्छता आणि आरोग्य दोन्हीही पाळले जाते. निश्चितच जास्त भक्तांची तिथे काळजी घेतली जाते. मग स्थानिक पातळीवर आपण या गोष्टी का पाळू शकत नाही. मानवी शरीरातील प्लॅस्टिक आणि इतर विषारी द्रव्यांचे प्रमाण यामुळे वाढले आहे. प्याले आणि प्लेट उचलणारे थकून जातात. नगरपरिषेदला करोडोंचे टेंडर काढावे लागतात. कचऱ्याचा ढीग पेटवून दिल्यामुळे शहराच्या आजूबाजूचे वातावरण खराब होते. श्वसनाचे विकार वाढतात. महाराजांचे भक्त आणि संचालक मंडळ यांनी या गोष्टी समजून घ्याव्या.

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

### शिवजयंती

१९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तारखेनुसार) साजरी केली जाते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा महाराष्ट्रातील प्रत्येक शिवभक्तांसाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी दिवस आहे. आज ठिकठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. पोवाडे, गाण्यांचे कार्यक्रम, रॅली, भाषणे यांसारख्या उपक्रमांमुळे शिवचरित्राचा प्रचार होतो, हे नक्कीच प्रशंसनीय आहे. परंतु अशा कार्यक्रमांचे आयोजन म्हणजेच शिवरायांना दिलेली खरी आदरांजली ठरेल का? किंवा त्यांचे एक दिवस केलेले हे कार्यक्रम म्हणजेच स्मरण ठरेल का? याचा विचार करायला हवा. त्यांचे आचार, विचार, शौर्य, ध्येयनिष्ठा आणि नेतृत्वगुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करण्याची आज आवश्यकता आहे. शिवराय लहानपणापासूनच शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम होते. कुस्ती, दांडपट्टा, घोड्यावर स्वार होणे, तलवार चालवणे अशा खेळांमुळे त्यांच्यात निर्भयता, क्षात्रवृत्ती, अन्यायाविरुद्ध चीड, लढाऊवृत्ती, तसेच नेतृत्वक्षमता असे अनेक गुण निर्माण झाले. परंतु आजची मुले संगणकावर काल्पनिक खेळ खेळतात. त्या खेळातून विध्वंसक आणि विकृत विचारप्रवृत्ती वाढते. अशा खेळांतून मनाची दुर्बळता आणि आत्मकेंद्रितपणा देखील वाढतो. ती आत्मकेंद्रित बनल्याने त्यांच्यात राष्ट्रप्रेम; 'मला या राष्ट्रासाठी जगायचे आहे, काही करायचे आहे', असे व्यापक विचार कसे निर्माण होणार? तेव्हा शिवरायांप्रमाणे आपल्या मुलांमध्ये देखील धर्मप्रेम, राष्ट्रप्रेम निर्माण करण्यासाठी त्यांच्यावर योग्य संस्कार करणे गरजेचे आहे.

शिवरायांचे अनुकरण करणे, म्हणजे केवळ जयघोष करणे नव्हे, तर त्यांचा निःस्वार्थी सेवाभाव, धैर्य, न्यायप्रियता, स्वराज्यनिर्मितीची तळमळ आणि त्यांचे तत्त्वज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात आत्मसात करणे हीच खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी होईल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# ‘आम्ही असू अभिजात’ संमेलन गीताला नांदेडचा संगीत साज !

## आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे गीत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ फेब्रुवारी**

नवी दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे गीत नांदेडच्या सुप्रसिद्ध गायिका, संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले आहे. दिग्गज गायकांचा सहभाग असणारे अभिजात मराठीला शब्दबद्ध करणाऱ्या दीर्घ काव्याला त्यांनी संगीताचा साज चढवला असून तमाम नांदेडकरांसाठी ही आनंदाची बाब आहे.

९८ व्या मराठी साहित्य संमेलनासाठी नांदेड मधून एकीकडे शेकडो साहित्यिक रवाना होत आहे. आता नांदेडसाठी आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केलेले ’आम्ही असू अभिजात ’ हे संमेलन गीत आणखी एक आनंद वार्ता ठरले आहे.



काल राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते या गीताचा शुभारंभ सोहळा पार पडला. यावेळी नांदेडच्या संगीतकार आनंदी विकास यांचाही सत्कार करण्यात आला. पुण्याचे गीतकार डॉ. अमोल देवळेकर यांनी लिहिलेल्या ’आम्ही असू अभिजात ’, या मराठी भाषेच्या गौरवगीताला संगीताचा साज चढविण्याचे काम त्यांनी केले आहे. विशेष म्हणजे या गीताचे पार्श्वगायन सुप्रसिद्ध गायक हरिहरन, शंकर महादेवन, मंगेश बोरगावकर, प्रियंका बर्वे,सागर जाधव, शमिमा अख्तार यांनी केले आहे.या गीताचे संगीत संयोजन प्रथमेश कानडे, ध्वनिमुद्रन मन्मथ मठपती, ध्वनि मिश्रण आदित्य देशमुख यांनी केले आहे. हे गीत संगीत, पार्श्वगायन, लेखन सादरीकरण या सर्वच कसोटीवर आगळे वेगळे सिद्ध होत आहे. या संपूर्ण गाण्याचे चित्रीकरण कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात आले आहे. त्यामुळे या गाण्याचा व्हिडिओ देखील लक्षवेधी ठरला आहे. मराठी भाषेच्या अभिजात दर्जा प्राप्त होण्याच्या घटना क्रमावर आधारित हे गीत असून कवी अमोल देवळेकर यांनी १० अंतऱ्याचे हे दीर्घकाव्य मराठीच्या अभिजात दर्जाचा गौरव करताना लिहिले आहे. संदर्भाचे सुनियोजित सादरीकरण या गीतातून होत आहे. दरम्यान, आयोजकांनी काल या गीताचे राज्यपालांच्या हस्ते लोकार्पण करताना संगीतकार आनंदी विकास यांना सन्मानाने या साहित्य संमेलनाला आमंत्रित केले आहे. साहित्यप्रेमी नांदेडकरांसाठी ही अतिशय आनंदाची बाब आहे.

## एसजीजीएस अभियांत्रिकी महाविद्यालयच्या नऊ विद्यार्थ्यांना सीमेन्स शिष्यवृत्ती

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १८ फेब्रुवारी**

नुकत्याच जाहीर झालेल्या सिमेन्स कंपनीच्या निकालात एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड येथे शिक्षण घेत असलेल्या ९ विद्यार्थ्यांनी प्रतिष्ठेची मानली जाणारी सीमेन्स शिष्यवृत्ती मिळवून संस्थेचे नावलौकिक केले आहे.

एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालय विष्णुपुरी येथील ९ विद्यार्थ्यांनी सीमेन्स शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवुन महाविद्यालयचे नावलौकिक केल्याबद्दल संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.सीमेन्स शिष्यवृत्ती मिळवलेली विद्यार्थी संचिता सोनवणे, प्रथम वर्ष संगणक अभियांत्रिकी, कृष्णाई मांगलेकर, प्रथम वर्ष, माहिती तंत्रज्ञान, सपना गाडेकर, प्रथम वर्ष, माहिती तंत्रज्ञान,श्रुतिका खांडील, प्रथम वर्ष, माहिती तंत्रज्ञान,अभिषेक वाघ, प्रथम वर्ष, सानिका भोसले, प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान, मयुरी अलवार, प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान, या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## मारोती कदम आज आकाशवाणीवर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ फेब्रुवारी**

टाकळी (धनगर) केंद्राअंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव (लिखा) ता. पूर्णा येथील उपक्रमशील शिक्षक मारोती कदम यांचे नांदेड आकाशवाणीवर शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरणविषयक दृष्टिकोन या विषयावर भाषण दि. १९ फेब्रुवारी रोजी बुधवारी सकाळी ठिक १०.४५ वाजता प्रसारित होणार आहे. तरी श्रोत्यांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाधिकारी विश्वास वाघमारे, निवेदक गणेश धोबे, प्रसारण अधिकारी राहुल अत्राम यांनी केले आहे.

## गेटकेन कारखान्यास ऊस देण्यापूर्वी विचार करावा : संचालक यशवंतराव देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १८ फेब्रुवारी**

हदगाव- हिमायतनगर, उमरखेड व कळमनुरी तालुक्यातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी शिऊर सा. का. मर्या. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी या कारखान्यास आपला ऊस द्यावा वरील सर्व तालुक्यातील ऊस १५ मार्च अखेर संपविण्याचे कारखान्याचे नियोजन असून बाहेरील कारखान्यास ऊस देऊ नये असे आव्हान संचालक यशवंतराव देशमुख यांनी केले आहे तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी गाळपास येणाऱ्या उसाकरिता ऊस पुरवठा प्रोत्साहन पर योजना १६ फेब्रुवारी २०२५ ते १६ मार्च च्या पुढे पंधरवड्यात वाढीव रक्कम २५०० ते २७०० पर्यंत भेटणार आहे.

पुढील २०२५-२६ च्या गाळप हंगामात महाराष्ट्रातील सर्व धरणे भरली असून इतर कारखाने ऊस गाळपास घेऊन जातील पण पुढच्या वर्षी हे कोणीच येणार नाहीत तरी आपण वेळीच सावध होऊन या गेट केन कारखान्याच्या आमिषाला व खोट्या प्रलोभनला बळी न पडता तसेच उसाच्या पैशासाठी या गेटकेन कारखान्यात हेलपाटे मारावे लागत असल्याचे अनुभव असून पुढील वर्षी ऊस गाळपावी उभा राहू शकतो. त्यामुळे शिऊर सा.का. मर्या. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी या कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे असे आव्हान संचालक यशवंतराव देशमुख यांनी केले तरी या गेटकेन कारखान्यांनी आतापर्यंत ऊस बिलाची रक्कम अद्यापही दिली नाही अशी धक्कादायक माहिती समोर आली असून त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी वेळीच सावध होऊन आपल्या हक्काचा शिऊर सा.का. मर्या. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसणी या कारखान्यास द्यावा.

## ज्ञानेश्वर महाराव यांना नांदेड शहरात येण्यास बंदी घालावी : सकल हिंदू समाज

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ फेब्रुवारी**



प्रभु श्रीराम व स्वामीं समर्था बद्दल अपशब्द वापणाऱ्या ज्ञानेश्वर महाराव यांना नांदेड शहरात येण्यास बंदी घालावी अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने जिल्हा पोलीस अधिक्षक व जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने शिवजयंती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख वक्ता म्हणून ज्ञानेश्वर महाराव यांना बोलविण्यात येणार आहे. यापुर्वी त्यांनी प्रभु श्रीराम व स्वामीं समर्थ यांच्या बद्दल अपशब्द वापरलेले आहेत. देवी-देवतां बद्दल अपशब्द वापरणाऱ्या अशा प्रवृत्तीचा निषेध असून अशा लोकांना नांदेड शहरात येण्यास बंदी घालावी अन्यथा ते शहरात आल्यास त्यांचा वेगळ्या स्टाईलने समाचार घेतल्याशिवाय सकल हिंदू समाज शांत बसणार नाही. असा इशारा निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. निवेदनावर कृष्णा देशमूख, शशिकांत पाटील, वैभव दरबस्तवार, अनिल लालवानी, हरीष कुडाळ, साईनाथ जाधव, आकाश कापकर, कृष्णा इंगळे, गणेश कोकूलवार, गोविंद शर्मा, ज्ञानेश्वर पवार, राजू अंभोरे, गणेश लोकम, अभिषेक मेळदे, आंनद मरेवार, अभिषेक भोपळे, राजेश पाटील, प्रविण लोकम, विकास कापकर, लप्पू उपरणे, रुद्रा हसंगपीली, राजेश देशमूख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### संक्षिप्त वृत्त

## राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश संघटकपदी मिलिंद सोनकांबळे

**देगलूर**-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांच्या समतीने राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश अध्यक्ष प्रा. सुनिल मगरे यांच्या हस्ते मिलिंद मारोती सोनकांबळे कावळगांवकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक पदी निवड करून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. या निवडी बद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष संभाजी मुकनर, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब सोनकांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग लातूर जिल्हा अध्यक्ष प्रदीप जोंधळे, राष्ट्रवादी युवक जिल्हा उपध्यक्ष संतोष पाटील थडके, देगलूर तालुका अध्यक्ष राहुल देसाई देगावकर, देवेंद्र मोतेवार, नरेश पाटील, अशोक कांबळे देगलूरकर, रंजित पाटील, मिलिंद मांजरमकर, पांडुरंग राजुरे, मलिकार्जून कडलवार, बालाजी भुतनारे, राष्ट्रवादी युवक बिलोली तालुका अध्यक्ष नीलकंठ पाटील दुडले, गणेश शिंदे, राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे शहर अध्यक्ष कुरिशी, हणमंत पांडवे, अंकुश हणमंते, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सामाजिक, राजकीय, विविध क्षेत्रातील जनतेकडून त्यांना अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिले आहे.



## भाजपाच्या सदस्य नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १८ फेब्रुवारी**

विधानसभा निवडणुकीत अभुतपूर्व मिळालेल्या यशानंतर भाजपाने पुन्हा पक्ष संघटन व बळकटीकरणावर विशेष भर देत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्ण महाराष्ट्रात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार सदस्य नोंदणी संघटन पर्व १ अभियानास प्रारंभ झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सांसद अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सदर अभियान प्रारंभ झाला असून प्रमुख पदाधिकारी पासून ते बूथ प्रमुखापर्यंत यांचा झंझावत सुरू असल्याचे दिसून येत आहे.



भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार १ जानेवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत सदस्य नोंदणीचे अभियान प्रारंभ झाला आहे. ज्यात बूथ प्रमुखाला २५० सदस्य नोंदणीचे लक्ष निर्धारित करण्यात आले. हदगाव तालुक्यात जवळपास ५० हजार सदस्य नोंदणीचे लक्ष देण्यात आले होते त्यास येणाऱ्या १९ फेब्रुवारी पर्यंत हे लक्ष साध्य करण्यात येईल असे दिसून येत आहे. भाजपा माजी शहराध्यक्ष तथा महामंत्री, सदस्य नोंदणी अभियान सह संयोजक बाळा पाटील यांनी या अभियानात निवघा, तामसा, आष्टी, पळसा, मनाठा या जिल्हा परिषद गटांसह हदगाव शहरात आता लक्ष केंद्रित केले आहे. प्रस्तुत प्रतिनिधीने या अभियानाविषयी संपर्क केला असता बाळा पाटील म्हणाले की, या सदस्य नोंदणीचा फायदा हा येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाला याचा निश्चितच फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला. प्रत्येक बुथ अध्यक्ष या अभियानात जीव ओतून सदस्य नोंदणीच्या माध्यमातून प्रत्येक मतदारा पर्यंत पोहोचण्याचा या अभियानातून साध्य होत आहे.

या कामी पक्षाचे पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभत असल्याचे दिसून येत आहे.

## निवघा येथील दोन युवकांची महसुल सहाय्यक पदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १८ फेब्रुवारी**



मुदखेड तालुक्यातील निवघा गावातील दोन युवकांची एमपीएससी मधुन महसुल सहाय्यक पदी नियुक्ती झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

या सात्कार सोहळा कार्यक्रमा प्रसंगी भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते राजेश विठ्ठलराव पवार, व साहेबराव बालाजी कानुलकर, यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. राजेश पवार आणि साहेबराव कानुलकर यांनी आपाट कष्ट करून मनात जिद्द बाळगुन त्यांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांचे हे यश पाहुन गावातील इतर युवकांनी मनात जिद्द बाळगून यश गाठावे आणि निवघा गावाचे व आपल्या आई वडिलांचे नाव लौकीक करावे असे मत गावातील जेष्ठ नागरिकांनी व्यक्त केले. या सत्कार कार्यक्रमा प्रसंगी गावकऱ्यांनी त्यांचा सत्कार करुन त्यांचे कौतुक केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थीत असलेले आमदार श्रीजया चव्हाण, बाळासाहेब देशमुख बारडकर उपसरपंच बारड, उद्धवराव पवार, कामाजी पवार, विश्वनाथ पवार,बालाजी कानगुलकर निवघा, प्रभाकर पवार,विठ्ठल पवार , सचिन पवार, निजाम शेख, व सर्व गावातील जेष्ठ नागरिक व युवा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## कायदा व सुव्यवस्था राखून शिवजन्मोत्सव साजरा करावा : सपोनि. जाधवर

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १८ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती शासनाकडून व शिवप्रेमींकडून साजरी करण्यात येणार असून, नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून शिवजन्मोत्सव शांततेत साजरा करावा असे आवाहन माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश जाधवर यांनी १६ फेब्रुवारी रोजी पोलिस ठाण्यात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत शिवप्रेमींना मार्गदर्शन करताना केले.



या बैठकीस ठाणे हद्दीतील पोलिस पाटील, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य, शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी अनेकांनी शिवजन्मोत्सव शांततेत साजरा करुन पोलिस प्रशासनास सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीस बिट जमादार पठाण, गजानन कुमरे, दारासिंह चौहान, संघरत्न सोनसळे, राज ठाकरे आदी पोलिस कर्मचाऱ्यांची उपस्थिति होती.

## असंख्य कार्यकर्त्यांसह २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीत प्रवेश करणार : मोहनराव हंबर्डे

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १८ फेब्रुवारी**

येत्या २८ फेब्रुवारी रोजी आपल्या असंख्य समर्थकांसह राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यातील आपल्या पुढील राजकीय वाटचालीस सुरुवात होणार आहे , अशी माहिती नांदेड दक्षिणचे माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांनी दिली.



नांदेड दक्षिणचा आमदार या नात्याने मी या मतदारसंघाचा संपूर्ण कायापालट करण्यात कुठेच कमी पडलो नाही. मतदारसंघासाठी कोट्यवधीचा विकास निधी उपलब्ध करून दिला. म्हणेल त्या व्यक्तीचे काम ताबडतोब करून दिले. जनतेनेही मला भरभरून प्रेम दिले. यापुढेही त्यांचे आशीर्वाद, प्रेम असेच कायम राहील असा विश्वास व्यक्त केला . तसेच मोहनराव हंबर्डे म्हणाले राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक वाढीसाठी मी यापुढे प्रयत्नशील राहणार आहे. यापूर्वीही मी राष्ट्रवादीमध्ये कार्यरत होतो. शिवाय पक्षाने मला २००७ मध्ये पंचायत समिती उपसभापतीपदी विराजमान केले होते. माझे असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी माझ्यासोबत असून सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्यात राष्ट्रवादीला बळकटी मिळवून देण्यासाठी अहोरात्र परिश्रम करण्याची माझी तयारी आहे.

आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व इतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला घवघवीत यश मिळेल असा आत्मविश्वासही मोहनराव हंबर्डे यांनी व्यक्त केला. २८ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ओम गार्डन नांदेड येथे पक्षप्रवेश सोहळा होणार असून यावेळी असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी, माजी जि प सदस्य, माजी नगरसेवक, सरपंच ,उपसरपंच माझ्यासोबत राष्ट्रवादीमध्ये दाखल होणार आहेत.

छायाचित्र नरेंद्र गडप्पा



**नांदेड : अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थे जि.शखा नांदेडच्यावतीने आयोजित हॉटेल ताज पाटील येथील कार्यक्रमात भव्य सत्कार सोहळ्या प्रसंगी बोलतांना राष्ट्रीय महासचिव व सत्कारमुर्ती गजानन साटोटे व्यासपीठावर विभागीय अध्यक्ष हणुमंतराव आपटे, कार्याध्यक्ष दिलीप आपटे, महिला महिला अध्यक्षा सौ. अश्विनी आपटे, कोल्हापूर येथील माजी नगरसेविका मिनाक्षी काटकर, राष्ट्रीय समन्वयक नानासाहेब लवारे, प्रदेश उपाध्यक्ष रमेश गहिरे, बालाजी निलेवाड, नारायण बदनवाड, प्रभाकर मंढरे, पी.एम.गलपवाड, डी. के. तोकलवाड, गणपत पांडलवाड, नामदेव बट्टेवाड, व्यंकट नागलवाड, ज्ञानेश्वर प्रेमलवाड, शोभाताई पामलवाड, विजयमाला लांडगे आदी.**

## वन्य प्राण्यांची पाण्यासाठी मानवी वस्तीकडे धाव

### ▶▶ जंगलातील कृत्रिम पाणवठे पडले कोरडे ठाक

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. १८ फेब्रुवारी**

इस्लापूर परिसरातील नैसर्गिक पाण्याचे वेगाने बाष्पीभवन होत असल्याने जंगलात पाण्याची दुर्मिष्य निर्माण झाले आहे. वन्य प्राण्यांना जंगलात पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने वन्य प्राणी मानवी वस्तीकडे धाव घेत आहेत. परिणामी वन्य प्राण्यांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता वाढली आहे.



उन्हाळा आता चांगला तापायला लागला आहे. उन्हाची तीव्रता दिवसेदिवस वाढत चालल्याने नैसर्गिक पानवठ्याचे बाष्पीभवन होत चालले आहे. जंगलात आता पाणीच नाही, वन विभाग सध्या झोपेत असल्याचे दिसून येत आहे. मागील काळात आमदार भीमराव केराम यांनी कृत्रिम पाणवठे तयार करून त्यामध्ये पाणी सोडण्याची सूचना वन विभागाला केली होती. परंतु या वर्षी वन विभाग या बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे सध्या जंगलातील कृत्रिमरीत्या तयार केलेले पाणवठे कोरडे ठाक पडले आहे. त्यामुळे वन्य प्राणी पाण्यासाठी वन वन भटकत आहेत परिणामी त्यांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता असून वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी ‘दिन जाव पगार आव’ भूमिकेत दिसून येत आहेत. या बाबीकडे जिल्हा उप वन संरक्षक यांनी तात्काळ लक्ष घालून कर्तव्य तत्परता विसरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारुन वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी अशी मागणी होत आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ फेब्रुवारी**

नांदेड जिल्ह्यात २ मार्च २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २ मार्च २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

## भोकर सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंत्याच्या कार्यकाळात झालेल्या कामाची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ फेब्रुवारी**

गेल्या काही वर्षापासून भोकरच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काही ठराविक मर्जितल्या गुत्तेदारांनाच कामे देण्यात येत असल्याने सदरील कामे कंत्राटदारांकडून निकृष्ट पध्दतीने होत आहेत. दहा लाखाच्या आतील अनेक कामे फक्त कागदोपत्री दाखवून प्रत्येक जागेवर काम न करता बिले मंजूर करून रक्कम उचलून शासनाच्या निधीची विल्हेवाट लावण्याची पध्दत सुरू आहे. सदर बाब शिवसेनेचे तालुका प्रमुख अमोल पवार यांच्या निदर्शनास येताच त्यांनी २०२१ ते २०२४ या कालावधीत झालेल्या सर्व कामाची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

**शिवसेनेचे अमोल पवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**

भोकर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या मागील चार वर्षाच्या कार्यकाळात अनेक बोगस कामे झाली असून आपल्या मर्जीतल्या गूत्तेदारांना हाताशी धरुन, इंटरनल टेन्डर प्रक्रियेत मॅनेज करुन बोगस पध्दतीने अत्यंत हलक्या दर्जाची कामे करण्यात आली आहेत. २०२१-२०२४ या मागील चार वर्षाच्या कार्यकाळात भोकर सार्वजनिक विभागात कूठल्याही शासन नियमाचे पालन न करता सि.सि.रोड बांधकाम, ड्रेनेज बांधकाम, खड्डे बूजविणे हि कामे अंदाजपत्रकानूसार न करता थातूर मातूर पद्धतीने करण्यात आली व बिले उचलण्यात आले. दहा लाखाच्या आतील अनेक कामे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्ष कोणतेही काम न करता बिले मंजूर करुन ती उचलण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी याकडे विशेष लक्ष घालून झालेल्या सर्व कामाची उच्चस्तरीय चौकशी करुन संबधित गूत्तेदारांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हे चार वर्षापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने मर्जीतील गूत्तेदारांना हाताशी धरुन बोगस कामे करण्यात आली दरम्यानच्या कार्यकाळात सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर मध्ये किती कामे करण्यात आली व ती कामे किती रक्कमेची होती याची चौकशी व्हावी व कामाचा दर्जा तपासण्यात यावा यासह चार वर्ष एकाच ठिकाणी कार्यकारी अभियंता कसे राहू शकतात याची देखील चौकशी करण्याची मागणी शिवसेनेचे भोकर तालूका प्रमूख अमोल धनराज पवार यांनी राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस, उपमूख्यमंत्री एकनाथ शिंदे, बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी, अधिक्षक अभियंता, उपविभागीय अधिकारी भोकर, तहसीलदार, अधिक्षक अभियंता आदिंना पाठविण्यात आल्या आहे.





छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील आश्वारूढ पुतळ्याची सजावट करण्यात आली. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने आज बीड शहरातील प्रमुख मार्गांवर निघणार

जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने उद्या बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने जिल्हाभरात एकाच वेळी जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा निघणार आहे. हा उपक्रम देश पातळीवर देखील होत असून याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करणार आहेत.



१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी प्रमाणे राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून यंदापासून छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यानिमित्त निघणाऱ्या पदयात्रेस येथील जिल्हा क्रीडा संकुलातून प्रारंभ होईल. आरंभी भारतमाता तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूजन करून संविधानाचे वाचन करण्यात येणार आहे. यानंतर पाच किलोमीटर अंतराची ही पदयात्रा शहरातील विविध मार्गातून जाईल. तत्पूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानिमित्त सर्वांना संदेश देणार आहेत.

जिल्हास्तरावर बीड येथे तसेच सर्व तालुक्यांच्या ठिकाणी देखील या स्वरूपाच्या पदयात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी याबाबत घेतलेल्या एका आढावा बैठकीत दिली.

जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा मार्ग

केंद्र शासनाचा युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय तसेच महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य व राष्ट्राच्या शाश्वत विकासात युवकांचे मोलाचे योगदान आहे. युवकांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होऊन व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवाभाव तसेच शासकीय उपक्रमाबाबत माहिती व सहयोग यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील पदयात्रा १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल सहयोग नगर, येथून निघणार असून ती सारडा कॉम्प्लेक्स चौक, शहर पोलीस स्टेशन चौक, सुभाष रोड मार्गे, भाजी मंडई चौक, बशीर गंज चौक व छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जाणार आहे.

पदयात्रा सकाळी ९.०० वाजता सुरू होणार असून याचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे यात अधिकाधिक युवकांनी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पदयात्रेबाबतचा आढावा आज एका बैठकीत शैलेश सूर्यवंशी यांनी घेतला. या बैठकीस शिक्षणाधिकारी तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी व स्काऊट गाईड तसेच एनसीसी आदींचे अधिकारी उपस्थित होते.

या पदयात्रेत नववी ते अकरावी वर्गातील स्काऊट गाईड विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थी, विद्यार्थिनी खेळाडू, नागरिक शासकीय अधिकारी-कर्मचारी आदी सहभागी होणार आहेत. यात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# परळीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शिवजयंती उत्सवाचे आयोजन

### १९ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी दरम्यान स्वराज्य सप्ताहाचे आयोजन!

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ फेब्रुवारी**

राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून परळी वैद्यनाथ शहरात प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक १९ ते २७ फेब्रुवारी या दरम्यान स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उद्या सकाळी १० वाजता शिवजयंती साजरी करण्यात येणार असून, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर आबा चव्हाण, युवक नेते अजय मुंडे यांसह आदी उपस्थित राहतील.



धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवकालीन महाद्वाराची प्रतिकृती, प्रकाशयोजना तसेच खास सेल्फी पॉईंट उभारण्यात येत आहे.

या वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रुवारी रोजीची जयंती ते २७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांच्या जयंती पर्यंत विविध समाजोपयोगी कार्यक्रम, मराठी भाषा दिवस, स्वच्छता मोहीम यांसह विविध उपक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून घेतले जाणार आहेत.

या शिवजयंती सोहळयाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके तसेच शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे.

# रामनगर येथे शिवजन्मोत्सवासह हरिनाम सप्ताहाची आज सांगता

**स्वामी योगीराज महाराज यांचे काल्याचे कीर्तन; बहूसंख्येने उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मागील १३ वर्षांपासून बीड तालुक्यातील रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. या सप्ताहास बुधवार, १२ फेब्रुवारीपासून श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला आहे. आज बुधवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी शिवजन्मोत्सवानिमित्त भव्य मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर दुपारी १२ ते २ यावेळेत महंत स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर महाप्रसादाचा आयोजन केले आहे. तरी पंचक्रोशितील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन रामनगर ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने बीड तालुक्यातील रामनगर येथे एक दिवसाची जयंती साजरी न करता सात दिवस अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून शिवविचारांचा जागार केला जातो. या सप्ताहात भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले होते. तर रतनताई महाराज, शिवाजी महाराज नेवडे, ज्ञानेश्वरीताई कृष्णा रत्नपारखी, बाळकृष्ण महाराज मोरे, श्रीकृष्ण महाराज उबाळे, उत्रेश्वर महाराज पुर्भे, परमेश्वर महाराज माने यांची प्रवचन सेवा झाली. तर विनोदाचार्य भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, भागवताचार्य दत्ता महाराज हुके, विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे, वारकरीभुषण अण्णा महाराज शेळके, बालकिर्तनकार सोहम महाराज सातपुते, आचार्य भगवंत महाराज पुरी, विनोदाचार्य परमेश्वर महाराज इंगळे यांची कीर्तन सेवा होणार आहे.

# सार्वजनिक शिवजयंती उत्सवात सहभागी व्हा

## आ.संदीप क्षीरसागरांचे बीडकरांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ फेब्रुवारी**

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून आगळयावेगळया स्वरूपात शिवजयंती साजरी करण्यासाठी आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांनी याहीवर्षी शिवजयंती साजरी होणार आहे. शिवजयंती सोहळ्यास सर्व बीडकर बंधू-भगिनिंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे बीड शहरात आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनातून भव्य दिव्य आणि आगळयावेगळया स्वरूपात शिवजयंती साजरी केली जात आहे. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य आणि क्रीडा कार्यक्रमांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे शिवजयंती साजरी होत आली आहे. दरवर्षी प्रमाणे बीडच्या सांस्कृतिक परंपरेनुसार सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शासकीय महापूजा आणि सायंकाळी ६:०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष प्रा.श्री.सत्येंद्र पाटील, उपाध्यक्ष हाजी नसीम इनामदार व श्री.विष्णू वाघमारे, सचिव श्री.दिपक कर्नावट, कोषाध्यक्ष श्री.शिवाजी सानप, सहकोषाध्यक्ष सी.ए.श्री.संतोष आमटे व श्री.अशोक ठाकरे, प्रसिद्धी प्रमुख दिलीप खिस्ती तसेच सदस्य डॉ.प्रशांत गायकवाड, प्रा.कॅप्टन जगन्नाथ चव्हाण, श्री.अंकुश निर्मळ, श्री.प्रकाश वक्ते, प्रा.डॉ.रेखा ढेरे, डॉ.पुजा जाधव, श्री.सुमंत खांडे या सर्व समिती सदस्यांच्या चोख नियोजनाखाली यावर्षीची शिवजयंती ऐतिहासिक होणार आहे. तरी सर्व बीडकरांनी या शिवजयंती उत्सव सोहळयात सहभागी होऊन भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळयाचे साक्षीदार व्हा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



ही आहेत सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे

तब्बल ४५० ढोलताशांचे 'करवीर नाद' नावाचे सुप्रसिद्ध असलेल्या ढोलताशा पथकाचे सादरीकरण

तिबेटियन मॉंक' अर्थात तिबेट देशातील धर्मगुरूंचे जगप्रसिद्ध असलेले 'शाओलीन मार्शल आर्ट'

पश्चिम बंगाल येथील 'रायबिशी आर्ट स्कूल' नावाचे पथक ऍक्रोबाईक्स आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर करणार.

ओडिशा राज्यातील 'दुलदुली बाजा' नावाचे आदिवासी वाद्य पथक आपली कला सादर करणार.

आंतरराष्ट्रीय दर्जाचा लाईट आणि लेजर शो.

महिला, वृध्द आणि बालकांसाठी असणार विशेष बैठक व्यवस्था

दरम्यान या कार्यक्रमामध्ये महिला, लहान मुले आणि वृद्धांसाठी विशेष बैठक व्यवस्था असणार आहे. जेणेकरून महिला भगिनींनाही कार्यक्रमाचा आनंद घेता यावा. तसेच कार्यक्रमस्थळी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याचेही समितीकडून सांगण्यात आले आहे.



# केज येथे शिव साम्राज्य शिवजन्मोत्सव आयोजित रक्तदान शिबिरात १०० रक्तदात्यांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१८ फेब्रुवारी**

केर शहरात छत्रपती शिवराय जयंती निमित्त शिव साम्राज्य जन्मोत्सव समितीने मंगळवार रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले.शिबिरात १०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. सामाजिक उपक्रमाने केज येथील शिवजन्मोत्सव साजरा होत आहे.

शिव साम्राज्य शिवजन्मोत्सवाचे

अमोल शिंदे, भैय्या शिंदे, सचिन रोडे, रवी दांगट, विलास आवाड, पपू ढगे, यशवंत रितापूरे, संजय गुंड,मुन्ना धनवडे, सागर डिकूळे,अशोक कदम, सारंग शिंदे, अतुल गुंड दुशांत लांब, अक्षय सत्वधर आदित्य विडेकर, शैलेश भूतकार, राहूल गुंड, अशोक रगडे, संतोष असवले अक्षय कदम, मयूर कदम, तुषार सत्वधर रुद्र जाधव आदी सदस्यांनी शिबिराचे नियोजन केले. रक्तसंकलनासाठी माजलगाव रक्तपेढी डॉ ज्ञानेश्वर गिलबिले,डॉ आर टि जाधवर,डॉ हनुमंत वेताळ,टेक्निशियन मोहन गायकवाड मनीषा हुरडूके,गणेश मेंडके, गणेश नागरगोजे आदींनी सहकार्य केले.

# सोमेश्वर मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात येत्या २० फेब्रुवारीला होणार सुरुवात सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ फेब्रुवारी**

बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे व सर्वांचे इच्छित मनोहर पूर्ण करणारे असे भगवान श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी गेल्या २१ वर्षापासून चालत आलेला हा अखंड हरिनाम सप्ताह या वर्षी या सप्ताहाचे २२ वे वर्ष आहे या २२ व्या वर्षी देखील मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड या ठिकाणी मोठ्या उत्साहात साधू संतांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये येत्या २० फेब्रुवारी ला म्हणजे येत्या गुरुवारी श्री भगवान सोमेश्वराचे पूजन करून या ठिकाणी श्री मंगल कलश स्थापना वेदमंत्राच्या जय घोषात होणार असून ब्रह्म वृद्धांच्या पवित्र वेद मंत्राच्या जय घोषणामध्ये या अखंड हरिनाम सप्ताहाची मोठ्या उत्साहात सुरुवात होणार आहे तरी या सप्ताहामध्ये अनेक महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार आपली कीर्तन सेवा देणार असून या कार्यक्रमांमध्ये प्रवचन कार देखील आपली सेवा करणार आहेत प्रवचन करा पैकी हरिभक्त परायण बाबुराव गोपीनाथ मुंडे महाराज ताडसोन्ना हरिभक्त परायण पांडुरंग महाराज रांजवन महाराज वडगाव हरिभक्त परायण विष्णु महाराज सुरवसे बीड हरिभक्त परायण राम महाराज भोरे हरिभक्त परायण रमेश वायभट महाराज वायभट वाडी हरिभक्त परायण सखाराम महाराज जाधव कोल्हेरवाडी हरिभक्त परायण १०८ विश्व रूप पाक्ष शिवाचार्य महाराज मनमत स्वामी संस्थान मांजरसुंबा हरिभक्त परायण रोहिदास शेळके महाराज वांगीकर हरिभक्त परायण अरुण नाना डाके महाराज काठोडा हरिभक्त परायण सौ गाडेकर ताई महाराज बीड हरिभक्त परायण मोहन महाराज शेळके वांगी हरिभक्त परायण भीमाशंकर तट महाराज बीड हरिभक्त परायण नामदेव महाराज शास्त्री भगवान वाडी तसेच हरिभक्त परायण भागवत महाराज मोठे बीड यांची वरील महाराज मंडळींची प्रवचन सेवा राहील व या सप्ताहामध्ये होणाऱ्या सर्व महाराष्ट्रातील नामांकित हरिभक्त परायण कीर्तनकारापैकी पहिले कीर्तनकार हरिभक्त परायण भाऊसाहेब महाराज बाळकृष्ण जोशी राजा पिंपरीकर गेवराई यांचे प्रथम कीर्तन त्यानंतर हरिभक्त परायण दीपक महाराज मोठे केज यांचे द्वितीय कीर्तन त्यानंतर हरिभक्त परायण विक्रम महाराज काळे श्रीक्षेत्र आळंदीकर यांचे तृतीय दिवशी कीर्तन सेवा त्यानंतर चौथ्या दिवसाची कीर्तन सेवा हरिभक्त परायण लक्ष्मण महाराज मेंगडे निगनुरकर तसेच पाचव्या दिवशीची कीर्तन सेवा हरिभक्त परायण श्री एकनाथ महाराज पुजारी श्री संस्थान विठ्ठल मंदिर पेठ बीड तसेच सहाव्या दिवशीची कीर्तन सेवा नि शुल्क कीर्तनकार हरिभक्त परायण रांधवे बापू महाराज महाराष्ट्र राज्य पुरस्कार सन्मानित गिनीज बुक नोंद यांचे होईल नंतर सातव्या दिवशीची काल्याच्या कीर्तनाची सेवा श्री हरिभक्त परायण ज्ञानेश्वर माऊली महाराज मंझरीकर यांचे सुश्राव्य उत्कृष्ट कालचे कीर्तन होईल आणि त्यानंतर महाप्रसाद होऊन या महाप्रसादाने मोठ्या उत्साहात या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व बीड शहरातील सर्व भाविक भक्तांनी या सात दिवसाच्या चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन देव देश आणि धर्म या साठी सातत्याने लोकांच्या सेवेमध्ये आपली सेवा देणारे असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा बीड नगरपरिषद चे सभापती मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी तसेच त्यांचे सर्व सहकारी पत्रकार व सर्व मित्र आप्तेष्ट यांनी या सात दिवस चालणाऱ्या श्री सोमेश्वर मंदिर येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी भाविक भक्तांनी उपस्थित राहून सर्व धार्मिक कार्यक्रम श्रवण करून आपला उद्धार करून घ्यावा आणि या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.



## खा.सुप्रियाताईंना ठेवीदाराचे निवेदन

# जिजाऊ मल्टीस्टेट ठेव घोटाळा ED अथवा CID मार्फत चौकशी करा..

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ फेब्रुवारी**

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को.ऑ.सो.लि. बीड सुमारे २०० कोटीचा घोटाळा झाला. बीड व धाराशिव जिल्ह्यातील सुमारे ३००० ठेवीरांची लुबाडणूक झाली.

तपास अधिकारी पो.नि. खाडे यांनी लाच घेऊन अप्रत्यक्ष आरोपींना मदत केली,तपासाचे तीन तेरा वाजवले. पो.नि.खाडे गेले, गोल्डे आले अद्याप जिजाऊ मल्टीस्टेट मधील मुख्य तिजोरीचा पंचनामा झाला नाही. अजब तपास होतो आहे. २०२३ मधील गुन्हा फॉरेन्सिक अहवाल सुद्धा आला नाही.मुख्य आरोपी बबन शिंदे यांनी अंग झटकले. पोलीस म्हणतात आरोपींचा बीपी वाढतो..जास्त चौकशी करता येत नाही.सखोल तपास झाला पाहिजे. या भुमिकेतुन ठेवीदारांचा लढा चालू आहे.

घोटाळ्याचा सर्वंकष छडा लावण्यासाठी एऊ अथवा CBI



उच्च स्तरीय तपास यंत्रणा मार्फत चौकशी व्हावी. या मागणीचे निवेदन खा.सुप्रिया सुळे यांना ठेवदारांनी दिले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, खा. बजरंग बाप्पा सोनवणे,आ.संदिप भैया क्षिरसागर यांच्या मार्गदर्शना खाली मस्साजोग ता.केज येथे राष्ट्रवादी नेत्या खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन...जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेवीदार कृती समितीच्या वतीने.,.. ठेव घोटाळा प्रकरणाची चौकशी ED अथवा CID मार्फत चौकशी करणे बाबत निवेदन देण्यात आले. यावेळी इंजि. सखाराम कळासे,शेख कुतुब भाई, मारुती तिपाले, भाऊसाहेब परसे,प्रा.मानेसर,आर.एस. गायकवाड, अच्युतराव वाघ, सुर्यभान नवले, प्रविण पोपळे,आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### दर्पण पुरस्कार वितरण सोहळा तुर्तास रद्द

**परभणी,/प्रतिनिधी :** कै. सौ. कमलताई जामकर दर्पण पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा आज मंगळवारी (दि.११) जिंतूर रस्त्यावरील महिला महाविद्यालयाच्याा सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला होता. परंतु, या पुरस्काराच्या मानकरी श्रीमती योजना घरत यांच्या मातोश्रींचे दु:खद निधन झाल्यामुळे हा सोहळा पुढे ढकलण्यात आला आहे, अशी मा[illegible]योजकांनी दिली आहे.

### ट्रकन उडवल्याने मोटारसायकलस्वाराचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा ते नांदेड या रस्त्यावर चुडावा गावाजवळ एका ट्रकने दिलेल्या जोरदार धडकेने दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाला. रविवारी ही दुर्देवी घटना घडली.

तालुक्यातील माखणी येथील राम नेमाजी गाडे व शिवाजी शंकर गाडे हे दोघे नांदेड येथील लग्नसोहळा आटोपून एम.एच. २२ ए.क्यू. ७७०८ या दुचाकीवरुन गावाकडे जात होते. चुडाव्याजवळ समोरून येणाऱ्या आयशर या ट्रकने (एमएच १२ टीव्ही १८३५) जोरदार धडक दिली. त्यात शिवाजी गाडे यांच्या डोक्यास जबर मार लागला. तर राम गाडे हे ही जखमी झाले. दरम्यान, नांदेड येथील एका रुग्णालयात उपचार सुरु असतांना शिवाजी गाडे यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर सोमवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने गावात मोठी शोककळा पसरली.

### संजय वैद्य नांदखेडकर यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील स्टेडिअम कॉम्प्लेक्समधील सरस्वती टाईपरायटरचे संचालक संजय भगवानराव वैद्य नांदखेडकर यांचे सोमवारी (दि.१०) सायंकाळी ५.२० वाजता निधन झाले. मृत्यू समयी ते ५६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, इंजि. निखिल, डॉ. श्रेयस ही दोन मुले, सून, तीन भाऊ, एक बहिण असा मोठा परिवार आहे.

दरम्यान, संजय वैद्य नांदखेडकर यांच्या पार्थीवावर मंगळवारी सकाळी ९ वाजता जिंतूर रस्त्यावरील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. तत्पूर्वी अमेय नगर येथील त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार आहे.

### शेख राजूर शिवारात वृध्दाचा आढळला मृतदेह

**परभणी,/प्रतिनिधी :** पालम तालुक्यातील शेख राजूर शिवारात एका अनोळखी वयोवृध्द नागरीकाचा सोमवारी (दि.१०) मृतदेह आढळून आला.

प्रत्यक्षदर्शनींनी तात्काळ पालम पोलिसांना त्याबाबत माहिती कळविली. पोलिसांनी धाव घेवून पंचनामा केला. त्या वयोवृध्दाची ओळख पटेल असे कोणतेही साहित्य मिळून आले नाही. पोलिसांनी या संदर्भात मृतदेहाची ओळख पटविण्या संदर्भात प्रयत्न सुरु केले होते.

### गंगाखेड तालुक्यातील झोला पाटीजवळ कार अपघातात एकाचा मृत्यू

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** तालुक्यातील झोला पाटीजवळ कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला तर एकजण जखमी झाला. ही दुर्देवी घटना सोमवारी (दि.१०) रात्री ९.३० वाजेच्या सुमारास घडली.

कृष्णा अच्युतराव भिसे (वय ४० वर्षे), पप्पु अच्युतराव डुबे (वय २८ वर्षे) हे दोघे एम.एच. ४३ ए.आर.९३०७ या क्रमांकाच्या कारने गंगाखेड येथून प्रिंप्रीकडे जात होते. त्यावेळी तालुक्यातील झोला पाटीजवळ रस्त्याच्या बाजूला असलेल्या खडीच्या ढिगाऱ्यावर कार गेल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला, त्यामुळे कार रस्त्याच्या बाजूला खड्ड्यात जाऊन पलटी झाली. या अपघातात कारमधील दोघेही जखमी झाले. जखमींना उपचारसाठी गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कृष्णा भिसे यांना मयत घोषित केले तर पप्पु डुबे यांना पुढील उपचारसाठी परभणी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, या प्रकरणी दशरथ भिसे यांच्या फिर्यादीवरुन गंगाखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जिल्हयातून थंडी झाली गायबच

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयातून गेल्या काही दिवसापासून थंडी अचानक गायब झाली आहे. त्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांना चांगलाच होत आहे. त्यातच या थंडीमुळे नागरिकांना काहीसा दिलासा तर मिळतच होता परंतू लवकरच उन्हाची वाढ झाली असल्यामुळे यंदाचा उन्हाळा देखील कसा असेल असा अंदाज सर्वसामान्य नागरिक आतापासून करु लागले आहेत.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# दर्जेदार रस्ते पायाभुत विकासाला चालना देतात- आ.डॉ.गुट्टे

**मोहन धारासूरकर**
**गंगाखेड ,/प्रतिनिधी-:** गाव आणि शहरांना जोडणारे रस्ते लोकोपयोगी असतात. त्यामुळे स्थानिकांचे व परिसरातील नागरिकांचे दळणवळण सुखकर होते. रस्ते निर्मातीचे अनेक फायदे असतात. चांगल्या पायाभुत सुविधांचा महत्त्वाचा घटक म्हणूनही रस्त्यांकडे पाहिले जाते. रोजगार, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य या सारख्या मुलभूत गरजांना परस्परांशी जोडणारा दुवा म्हणजे रस्ता असतो. त्यामुळे दर्जेदार रस्ते पायाभुत विकासाला चालना देतात, असे मत स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी व्यक्त केले. तालुक्यातील चोरवड येथे आयोजित रस्ता भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी राज्यमार्ग २४९ हिंगोली-औंढा-हट्टा- पूर्णा-पालम-चोरवड-राणीसावरगाव या जवळपास २२० कोटी रूपये निधीच्या तब्बल ४१ किमी रस्त्याचे भूमिपूजन आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते पार पडले. मतदारसंघातील गावोगावी पायाभूत सुविधा निर्माण करून देण्यासाठी कटिबध्द असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. याप्रसंगी नियोजित रस्त्यामुळे दळणवळण तर सुखकर होईल, मात्र इतरही समस्या सुटतील, असे उपस्थित नागरिकांनी म्हटले. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, राज्यमार्ग २४९ हिंगोली-औंढा-हट्टा- पूर्णा-पालम-चोरवड-राणीसावरगाव या रस्त्याचा प्रश्न वर्ष प्रलंबित होता. गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना रस्त्याअभावी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे स्थानिकांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून आपण पाठपुरावा केला होता. त्यास



यश आले असून आज त्याचे भूमिपूजन करताना समाधान वाटले. आता नागरिकांची समस्या कायमची दूर होणार आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अंतर्गत हे काम पूर्णत्वास जात आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यास परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होईल. तसेच या भागातील दळणवळण सुखकर झाल्याशिवाय राहाणार नाही, असा मला विश्वास आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम पाटील तर सूत्रसंचालन पदुदेव जोशी यांनी केले. आभार विजय घोरपडे यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष गणेशराव दादा रोकडे, माजी जिल्हा परिषद सदस्य रत्नाकरजी शिंदे, पालम तालुका प्रभारी माधवराव गायकवाड, ताडकळस कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बालाजी रुद्रवार, तालुकाध्यक्ष चंद्रशेखर लांडगे, युवक जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब ढोले, राष्ट्रवादी युवक विधानसभा अध्यक्ष कृष्णा दळनर, युवक तालुकाध्यक्ष विजय घोरपडे, रासपा तालुकाध्यक्ष तुकाराम पाटील, नगराध्यक्ष उबेद खान पठाण, अजीम खान पठाण ,अल्ताफ शेख, बालाजी लटपटे, ओबीसी तालुकाध्यक्ष पवन सोन्नर, विजय गाणार, गजानन सुरनर, मोतीराम खंडाळे, उप अभियंता बालाजी पवार यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सेलू नगर परिषदेच्या गलथान कारभाराचा कळसच

**शिवाजी आकात**

### नागरिकांना भुर्दंड, जबाबदार अधिकाऱ्याकडून खर्च वसूल करण्याची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरात विकासकामांचा धडाका मागील काही दिवसांपासून सुरू आहे.नवीन रस्ते,नाली,सुशोभीकरण आदी नागरिकांच्या सुविधेसाठी करण्यात येत आहे.याचाच भाग म्हणून छत्रपती शिवाजी महाराज ते मदरसा पर्यंत असलेला रस्ता हा नगर परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला वर्ग करून नवीन राज्य महामार्ग गेल्यावर्षी तयार करण्यात आला होता.या राज्य महामार्गावर दळण वळण मोठ्या प्रमाणत वाढलेले असून नागरी वस्ती मुळे दरदिवशी अनेक अपघात होत आहेत.त्यातच भरीस भर म्हणून वालूर नाका परिसरात जलवाहिनी जोडणीचे काम मागील दीड महिन्यापासून हाती घेण्यात आले असून नवीन झालेल्या रोडवर मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले आहे अद्यापही हे काम पूर्ण झालेले नसून नवीनच झालेल्या राज्य महामार्गाचे मोठे नुकसान करण्यात आले आहे.हा राज्य महामार्ग बनविण्याचे काम सुरू असताना अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अंतर्गत असलेल्या जलवाहिनीचे काम त्याच वेळी हाती घेवून पूर्ण केले गेले नाही त्यामुळे सद्यस्थितीत नवीन झालेला रोड खोदून जोडणी करण्यात येत आहे.या मनमानी कारभारामुळे नागरिकांकडून गोळा केलेला पैशाचा अपव्यय होत असून गैर जबाबदारीने वागणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांच्या पगारातून हा खर्च वसूल करण्यात यावा अशी मागणी मोरया प्रतिष्ठान व सेलू शहरातील नागरिकांकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## राज्यस्थानीच्या अध्यक्षासह पदाधिकाऱ्यांविरुध्द सेलूत गुन्हा

### साडेचार लाख रूपयांचा अपहार करून फसणूक केल्याप्रकरणी गुन्हा

**सेलू,/प्रतिनिधी:** परळी वैजनाथ येथील राजस्थानी मल्टिस्टेट को.ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेडच्या सेलू शाखेत फिर्यादीची फसवणूक करून त्याच्या ४ लाख ५० हजार रूपये रकमेचा संगनमत करून अपहार केला आहे. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष चंदुलाल मोहनलालजी बियाणी, पदाधिकारी व शाखाधिकारी अशा सहा आरोपीसह सोसायटीविरूद्ध विविध कलमांखाली सेलू पोलिस ठाण्यात सोमवारी. १० फेब्रुवारीरोजी अपहार व फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




या प्रकरणी अभय लक्ष्मीकांत सुभेदार (वय ५० वर्षे, रा.सुभेदार गल्ली, सेलू जि.परभणी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी अभय सुभेदार यांनी परळी वैजनाथ येथील राजस्थानी मल्टीस्टेट को.ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेडच्या सेलू शाखेत बचत खाते के ६४/५ मध्ये १ सप्टेंबर २०२३ रोजी ४ लाख ५० हजार रूपये अनामत ३० दिवसांकरिता मुदत ठेव म्हणून ठेवली होती. मुदत संपल्यानंतर बँकेत रक्कम काढण्यासाठी ते गेले. रितसर विड्राल फार्म भरुन दिला असता आरोपितांनी अरेरावीची भाषा वापरुन शिवीगाळ करुन धमकी दिली. ''आम्ही तुमचे पैसे देवु शकत नाही. तुम्हाला काय करायचे ते करा.'' असे सांगून नियोजनबध्द कट रचून फसवणूक करुन त्यांच्या रकमेचा अपहार केला. यावरून न्यायालयाच्या आदेशानुसार सोमवारी रात्री साडे आठ वाजता राजस्थानी मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी तसेच अध्यक्ष चंदुलाल मोहनलालजी बियाणी (रा.लातूर), उपाध्यक्ष बालचंद लोढा, सचिव बद्रीनारायण बाहेती, सहसचिव पी.डी.अग्रवाल, कोषाध्यक्ष विजय प्रकाश लड्ढा (सर्व रा.परळी वैजनाथ जि.बीड), शाखाधिकारी नंदकिशोर सोमाणी (रा.स्टेशन रोड, सेलू जि. परभणी) यांच्याविरूद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### परभणी शहरात रस्त्याचे काम सुरु

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या सुरु असून या कामाचा नागरिकांत आनंद आहे.

## प्रिन्स इंग्लिश स्कूलच्या गौरी अबुजची डॉ.होमी भाभा ज्युनिअर सायंटिस्ट परीक्षेच्या मुलाखत व प्रकल्पसाठी निवड



**सेलू,/प्रतिनिधी:** श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल ही शैक्षणिक गुणवत्ता आणि स्पर्धा परीक्षांमधील यशासाठी प्रसिद्ध आहे. याच यशाची परंपरा पुढे नेत गौरी श्रीहरी अबुज (वर्ग ६वी) हिने डॉक्टर होमी भाभा ज्युनिअर सायंटिस्ट परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

तिने प्रथम आणि द्वितीय फेरीत उज्वल यश मिळवून अंतिम मुलाखत व प्रकल्प फेरीसाठी निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्रिन्सिपल कार्तिक रत्नाला, प्रगती क्षीरसागर, स्पर्धा परीक्षा प्रमुख अर्जुन गरुड व संपूर्ण शाळा परिवाराने गौरीचे मनःपूर्वक अभिनंदन केले. व पुढील वाटचालीसाठी प्रिन्स इंग्लिश स्कूलच्यावतिने शूभेच्छा देण्यात आल्या.

## मांडवा येथे विवाहितेने केली आत्महत्या

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील मांडवा येथील एका झाडाला साडी ने गळफास लावून आत्महत्या केल्याचे घटना दि.११ फेब्रुवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली असून विवाहित महिलेचे नाव मनकर्णा लहू जाधव वय ३० वर्ष रा.साई नगर तांडा येथील असल्याचे समजते.



औंढा तालुक्यातील अंजनवाडा तांडा येथील विवाहित महिला मनकर्णा लहू जाधव यांचा विवाह १० ते १२ वर्षा पूर्वी जिंतूर तालुक्यातील इटोली परिसरातील साई नगर तांडा येथील युवक लहु जाधव यांच्या सोबत झाले होते.विवाहीत महिलेला मुल बाळ नव्हते दरम्यान दि.११ फेब्रुवारी सकाळच्या सुमारास मांडवा परिसरातील एका झाडाला साडी गळ्यात लावून गळफास लावून लटकलेल्या अवस्थेत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिस निरीक्षक बुध्दीराज सुकाळे,पिएस आय मैत्रे,बिट जमादार दत्तात्रेय गुगाणे,पो. शि.सावंत यांच्या पथकाने घटनास्थळावरून नागरिकांच्या मदतीने शव काढून दुपारच्या सुमारास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉ.अक्षय भंगीरे,रुग्ण कक्ष सेवक गंगाधर पालवे यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांना देण्यात आले असून याप्रकरणी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास बिट जमादार दत्तात्रेय गुगाणे करत आहे.

# आंबेडकरी जनतेला न्याय द्या, अन्यथा मंत्रालयाला घेराव घालू

### सिध्दार्थ हत्तीअंबीरे यांचा इशारा : मुंबईत पत्रकार परिषद

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणीमध्ये संविधानाची विटंबना केल्यानंतर संतप्त जनता रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असताना पोलिसांनी लाठीचार्ज केला. यामध्ये जखमी झालेल्यांना राज्य सरकारने तातडीने नुकसान भरपाई देवून आंबेडकरी जनतेला न्याय द्यावा अन्यथा ३ मार्च रोजी महाराष्ट्रातील सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, संविधानप्रेमी जनतेच्या वतीने आंदोलन करत मंत्रालयाला घेराव घालण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभागाचे अध्यक्ष सिध्दार्थ हत्तीअंबिरे यांनी दिला आहे.

बुधवार १२ फेबुवारी रोजी मुंबईत पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी माध्यमांच्या प्रतिनिधींशी हत्तीअंबीरे यांनी संवाद साधला. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते आणि स्लम सेल विभाग मुंबई अध्यक्ष सुरेशचंद्र राजहंस, अनुसूचित जाती विभाग मुंबई अध्यक्ष कचरु यादव, महासाचिब महेंद्र मुणगेकर, रमेश कांबळे, राज वाल्मिकी, व इतर उपस्थित होते.

पुढे बोलतांना हत्तीअंबीरे म्हणाले, परभणीमध्ये संविधानाची विटंबना केल्यानंतर संतप्त जनता रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असताना पोलिसांनी लाठीचार्ज केला. कोंबिंग ऑपरेशन करून शेकडो आंबेडकरी जनतेला बेदम मारहाण केली, अनेक निष्पाप नागरिकांना अटक केली. आंबेडकरी विचाराचा तरुण सोमनाथ सुर्यवंशी यालाही अटक करून कोठडीत मारहाण केली, यातच त्याचा मृत्यू झाला, पण सरकारने या प्रकरणी पोलिसांवर कठोर कारवाई केली नाही. सुर्यवंशी मृत्यूची चौकशी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींमार्फत करावी, तसेच संबंधित पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे, अशा मागण्या हत्तीअंबिरे यांनी केल्या आहेत.

पोलिसांच्या कारवाईमुळेच सुर्यवंशी व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते विजय वाकोडे यांचा मृत्यू झाला. या घटनेला दोन महिने झाले तरी या दोन्ही कुटुंबांना अजून न्याय मिळालेला नाही, सरकार चौकशीच्या नावाखाली पोलिसांना वाचवत आहे, असा आरोप करी हत्तीअंबीरे यांनी सरकारने या पोलिसांवर कठोर कारवाई करावी, कोंबिंग ऑपरेशन दरम्यान ज्या आंबेडकरी लोकांवर गुन्हे दाखल केले ते तात्काळ रद्द करावे, सोमनाथ सुर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, सुर्यवंशी व वाकोडे यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला सरकार नोकरीत सामावून घ्यावे, संबंधित पोलीसांवर हत्येच्या गुन्ह्यासह ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करावे, पोलिस मारहाणीत जखमी झालेल्यांना नुकसान भरपाई द्यावी आदी मागण्या केल्या आहेत.

## वितरण कंपनीचा वरिष्ठ तंत्रज्ञ चतुर्भूज

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्य विद्युत वितरण कंपनीच्या पाथरी उपविभागांतर्गत ग्रामीण शाखेतील वरिष्ठ तंत्रज्ञ ज्ञानोबा नारायणराव पितळे यास नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याकरीता एका शेतकऱ्यांकडून ३ हजार रुपयांची लाच स्विकारतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या एका पथकाने ताब्यात घेतले. मंगळवारी (दि.११) दुपारी पथकाने ही कारवाई केली.

झरी कॅनॉलजवळील असलेल्या शेतातील विद्युत मोटारीकरीता डिपीवर नवीन ट्रान्सफार्मर बसवून देण्याकरीता एका शेतकऱ्याने वरिष्ठ तंत्रज्ञ ज्ञानोबा पितळे यांच्याशी संपर्क साधला, तेव्हा पितळे याने ३ हजार रुपये द्यावे लागतील, असे सूनावले. त्यामुळे संतप्त शेतकऱ्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या परभणी कार्यालयाकडे लेखी तक्रार दाखल केली, त्याआधारे या खात्याच्या पथकाने पंचासमक्ष त्या संदर्भात खात्री केली अन् मंगळवारी सिमुरगव्हाण फाटा येथील मोहिनी टी हाऊसवर सापळा रचून पितळे यास ३ हजार रुपयांची लाच स्विकारतेवेळी ताब्यात घेतले. या पथकाने पितळे याची अंग झडती घेतली तेव्हा रोख आठ हजार रुपये आढळून आले. तर घराची झडती घेतली असता या झडतीतून ६ लाख ९५ हजार ११० रुपये पथकाने जप्त केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त

### शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर पथनाट्य



हिंगोली- येथील पोद्दार स्कुलच्यावतीने येथील शिवजन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारीत पथनाट्य सादर केले. यावेळी विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट पथनाट्य सादर केल्यामुळे उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी शिवजन्मोत्सव समितीचे पदाधिकारी माजी उपगनराध्यक्ष बिरजु यादव, प्रकाश इंगोले यांच्यासह शिवजन्मोत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आज निघणाऱ्या मिरवणुकीत महिलांचे बँड पथक, लेझीम पथक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारीत देखावे आदींचा मिरवणुकीत समावेश असणार आहे.

### विनारॉयल्टी वाळू, गाळ उपसा सुरू

हिंगोली- सेनगाव तालुक्यातील जांभरूण रोडगे ते पार्डी पोहकर दरम्यान बांधण्यात आलेल्या एका बंधाऱ्यावरून दिवसा हजारो ब्रास वाळू आणि गाळ ऊपसा विना रॉयल्टीचा होत आहे. येथील बंधाऱ्यातून अवैधपणे वाळू आणि गाळ ऊपसा करण्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने होत असून महसूल प्रशासनाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. याबाबत विचारणा केली असता पाचशे ते हजार रूपये घेत आहेत. नियमाप्रमाणे मालकास रॉयल्टी भरणे बंधनकारक असतांना याठिकाणी शासनाचा महसुल बुडवून चक्क हजारो ब्रास वाळू आणि गाळ अवैधपणे ऊपसा करीत असल्याचे दिसत आहे.



# विविध मागण्यांसाठी ग्रामसेवकांचे असहकार आंदोलन सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**

आदर्श ग्रामसेवक पुरस्काराचे मागील पाच वर्षापासून रखडलेले वितरण तातडीने करावे या मागणीसह इतर मागण्यांसाठी जिल्ह्यातील ग्रामसेवकांनी असहकार आंदोलन सुरू केले आहे. यासंदर्भात ग्रामसेवकांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नामदेव केंद्रे यांना निवेदन सादर केले आहे.



हिंगोली जिल्ह्यात जिल्हस्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्कारासाठी ग्रामसेवकांची निवड झाली आहे. मात्र मागील पाच वर्षापासून पुरस्काराचे वितरण करण्यात आले नाही. त्यामुळे ग्रामसेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या पुरस्काराचे वितरण तातडीने करावे, १०, २०, ३० आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ द्यावा, डोंगरकडा येथील चौदाव्या वित्त आयोगाच्या कामांचे मुल्यांकन करावे, वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके तातडीने निकाली काढावीत, मुद्रांक शुल्काची परिपूर्ण माहीती द्यावी यासह इतर मागण्यांसाठी ग्रामसेवक युनियनने वेळोवेळी प्रशासनाला निवेदन सादर केली तसेच आंदोलने ही केली परंतु अद्याप प्रशासानाने मागण्यांची दखल न घेतल्याने ग्रामसेवकांनी दि १८ फेब्रुवारीपासून असहकार आंदोलन सुरू केले आहे. जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केवळ आश्वासनेच दिली. अद्याप कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. त्यामुळे असहकार आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जिल्हाध्यक्ष दिलीप पांढरे, सरचिटणीस राजेश किलचे यांनी सांगितले. या आंदोलनामध्ये ग्रामपंचायतीमधील कुठल्याही प्रकारची माहीती जिल्हा परिषद किंवा आयुक्त कार्यालयास दिली जाणार नाही. तसेच त्यांनी बोलावलेल्या बैठकीलाही हजर राहणार नसल्याचे अध्यक्ष पांढरे यांनी सांगितले. परंतु गावकऱ्यांची कुठल्याही प्रकारची कामे खोळंबणार नाहीत याची दक्षता घेतली जाणार असून या आंदोलनात जिल्ह्यातील सुमारे ३०० ग्रामसेवकांनी सहभाग घेतला आहे.

दरम्यान, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची जिल्हस्तरीय तपासणी मंगळवार दि १८ पासून सुरू करण्यात येणार होती. याबाबत पथकाचे नियोजनही करण्यात आले होते. परंतु असहकार आंदोलनामुळे जिल्हास्तरीय तपासणी लांबणीवर टाकण्यात आली आहे.



हिंगोली- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध ठिकाणी स्वागत कमानी लावण्यात आल्या आहेत. तसेच येथील छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पूतळा परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. संपूर्ण शहर भगवेमय दिसत आहे.

छाया- विजय गुंडेकर

## पोलिस प्रशासन, नगर पालिकेकडून पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरात मिरवणूक तसेच इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त पोलिस प्रशासन आणि नगर पालिकेच्यावतीने तयारीची पाहणी करण्यात आली. यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, पोनि नरेंद्र पाडळकर, पालिकेचे स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, पंडीत मस्के यांच्यासह शिवजन्मोत्सव समितीचे ॲड उल्हास पाटील, जहीर भाई, बालाजी वानखेडे, प्रकाश इंगोले, कल्याण देशमुख, सागर डांगे, त्र्यंबकराव लोंढे, मिलींद उबाळे आदींची उपस्थिती होती.














































